www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 श्री.संतोष शिवदास आमले | 9594509661 श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 233 वा बुधवार दि. 07 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# स्व जनार्दन भगत पुण्यतिथी - एका संघर्षमहर्षिचे निरंतर स्मरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

चिरंजीवी व्यक्तिमत्त्वांना सामान्य बुद्धीक्षमतेने तोलता येत नाही, त्यासाठी समतोल आणि विवेकी बौद्धिक पातळी साध्य करावी लागते. चिरंजीवी आणि अजरामर व्यक्तिमत्त्वे नैसर्गिक पद्धतीने अस्तित्वात येत नाहीत, तर ती स्वतःच्या आयुष्यातील संघर्षातून तशी घडत असतात आणि आपल्या असामान्य कर्तृत्वाने अजरामर ठरत असतात. त्यांची विवेकबुद्धी, संयम, कार्यकुशलता, लोकसंपर्क आणि वैचारिक बैठक यामुळे त्यांचे स्थान समाजात निश्चित होत असते. माझे वडील स्व. जनार्दन भगत अर्थात आबा यांचे स्थान याच पद्धतीने जनमानसात अजरामर आहे आणि म्हणूनच त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आपण त्यांची पंचमहाभूतांमधे अंतर्भूत असलेली चिरंतन ऊर्जा आणि प्रेरणा आत्मसात करण्यासाठी नेहमी त्यांचे आवाहन करीत असतो. पुण्यतिथीचा उपक्रम हा त्यासाठीच आपण राबवीत असतो. आबांची सामाजिक, राजकीय आणि कौटुंबिक कारकीर्द ही सामान्यांच्या आकलनाच्या परीघाबाहेर आहे हे कोणीही सांगू शकेल कारण त्यांच्या कार्याचा आणि संघर्षाचा विस्तार तेवढाच मोठा आहे. आपल्या जीवनात एक संघर्षयोद्धा असलेले आबा शेवटपर्यंत एक भूमिपुत्र म्हणून जगले. एक शेतकरी म्हणून त्यांची दिनचर्या समोर येणाऱ्या समस्याग्रस्तांना, त्यांचे समदुःखी बनून, त्यांच्या अडचणी साम दाम दंड भेद या रणनीतीने समाजातील सक्षम व्यक्तींच्या सहकार्याने सोडविण्याचे आणि पिडीतांना न्याय देण्याचे सामाजिक काम करतानाच अव्याहतपणे वर्षानुवर्ष संपत आली हा आपल्यासमोर असलेला इतिहास आहे. त्यातूनच त्यांची ओळख एक न्यायबुद्धी असलेला, सामान्यांपासून वरिष्ठांपर्यंत पोच असलेला धुरंधर नेता तरीही एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व अशी बनली. घरगुती वादांपासून ते सरकारच्या अन्यायाविरोधात दाद मागण्यापर्यंत अनेक विषय आबांच्या जीवनात एका स्थितप्रज्ञ आणि विरक्त योगी पुरुषाप्रमाणे हाताळले गेले. त्यांची जगावेगळी कार्यशैली आज आपल्याला मंत्रमुग्ध करते आणि अशा पद्धतीने कामे करण्यासाठी आजच्या काळात तेवढ्या ताकदीच्या व्यक्तिमत्त्वांची कमतरता आपल्या लक्षात आल्यानंतर त्यांच्या अस्तित्वाची उणीव प्रकर्षाने आपल्याला भासते.....म्हणूनच त्यांच्या क्षमता आणि व्यक्तिविशेषांचे आवाहन आपल्याला आजही करावे लागते. एक परिपूर्ण नेता आणि अजातशत्रू समाजसेवक कसा असावा याचे दुर्मिळ उदाहरण म्हणजे आबा. ज्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे आणि अखंड जनसेवेच्या वृत्तीचे स्मरण एक प्रेरणा म्हणून आपल्या आयुष्यात आपल्याला नेहमी आधारभूत ठरते. आपल्या प्रगतीच्या वाटेवर आपल्याला आबांसारखा एक दीपस्तंभ नेहमी आवश्यक असतोच. हा दीपस्तंभ आमच्या आयुष्यात मेरूपर्वतासारखा अढळ असल्यामुळेच किमान आम्हाला तरी आमच्या प्रत्येक क्षेत्रातील यशाची खात्री कायम असते. एक धुरंधर राजकारणी, तर्कनिष्ठ विज्ञानवादी, लोकहितवादी शिक्षणतज्ञ आणि समाजकारणासाठी जगणारे विरक्त व्यक्तिमत्व म्हणून आबांचे कार्यमहात्म्य अलौकिक आहे आणि म्हणूनच त्यांची पुण्यतिथी हा गोरगरीब, कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या आयुष्यातील एक आनंदसोहळा बनलेला आहे. वास्तविक अशा अद्वितीय व्यक्तिमत्त्वाला आपण ऐहिक पातळीवर मुकलो याची पावलोपावली जाणीव सध्याच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आध्यात्मिक पातळीवर आपल्याला येणाऱ्या अनुभवांतून आपण घेत आहोत, पण अशा पुण्यस्मरणातून प्राप्त होणाऱ्या उर्जेतून आपण ही उणीव अंशतः भरून



काढत असतो आणि आपल्या कार्याला दैवी गती देत असतो. जनतेच्या प्रश्नांवर पोटतिडीकिने बोलणारा रोखठोक नेता आजमितीस सापडणे दुर्लभ झाले आहे. सामान्य माणसाचे दुःख समजून त्यांना न्याय मिळावा यासाठी भांडणारा राजकारणी, त्यांच्यासाठी सर्वार्थाने आपली शक्ती वापरणारा नेता दिसणे आज आपल्याला कठीण झाले आहे, आणि म्हणूनच आबांची गैरहजेरी प्रकर्षाने जाणवते. ते असते तर आपल्याला पदोपदी मार्गदर्शन करण्यासाठी आपला मार्गदर्शक पाठीशी आहे ही जाणीव आपल्यात राहून हाती घेतलेल्या कामांना आणि संकल्पांना एक धार आली असती. अशी परिस्थिती सध्या नाही हे दुःख व्यक्त करण्यासाठी पुण्यतिथी हे आज केवळ एक निमित्त आहे कारण प्रत्येक क्षणाला समोर येणारी परिस्थिती सामान्य माणसासाठी एक ज्वलंत संघर्षच आहे, जिच्यामधे आबांसारख्या ज्ञानपिपासू आणि प्रतिभावंत माणसाची गरज कायम भासते. वैज्ञानिक दृष्टिकोन बोलणे फार सोपे असते पण त्याचा आयुष्यात आचार करणे महाकठीण. शंभर टक्के विवेकवादी असणे सोपे आहे, पण शंभर टक्के विवेकवादी जीवन जगणे अत्यंत अवघड आहे. सामान्यांसाठी तर ही अशक्यप्राय बाब आहे. विवेकवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी प्रसंगी एकादशीलाही मांसाहाराचे समर्थन करणाऱ्याला समाजाकडून शिव्यांची लाखोली निश्चितच वाहिली जाते, पण संत तुकोबांप्रमाणे, महात्मा ज्योतिबांप्रमाणे स्थितप्रज्ञ राहून या परिस्थितीला संयमी वृत्तीने सामोरे जाऊन निव्वळ स्वतःच्या अजातशत्रुत्वाच्या ताकदीवर अनुयायांच्या गळीसुद्धा विज्ञाननिष्ठा उतरवण्याचे कौशल्य फक्त आबांकडेच होते. पुरोगामी विचारांना छेद देणारे शब्द वापरून स्पष्ट करायचे तर ही दैवी आणि अलौकिक ईश्वरी देणगी आबांना प्राप्त होती असे म्हणावे लागेल. विज्ञाननिष्ठ समाजप्रबोधनकार, शिक्षकांसोबतच शिक्षणाचाही कैवारी, समाजकारणासाठी राजकारण करणारा लोकनेता, शांतिदूत म्हणून वागणारा तरीही जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यात कठोर संघर्ष करणारा आणि त्यासाठी आवश्यक दैवी गुण धारण करणारा युगपुरूष, स्वातंत्र्यासाठी स्वतःची प्रतिभा आणि क्षमता खर्ची घालणारा एक जगावेगळा नेता, नव्हे, ' लोकनेता ' ही स्वर्गीय जनार्दन भगत अर्थात आमचे आबा यांची ओळख आजच्या दिवशी अधोरेखित करण्याचे भाग्य आम्हाला प्रतिवर्षी लाभते यासाठी आम्ही ईश्वराचे आभार मानावेत की अशा व्यक्तिमत्वाला आणि त्याच्या उपयोगितेला पारखे करून आम्हाला निष्प्रभ केल्याबद्दल त्याला दोष द्यावा हेच काही काळ लक्षात येत नाही. शिक्षण आणि शिक्षकाचे हितचिंतक, थोर समाजसेवक, विज्ञाननिष्ठ नागरिक, न्यायप्रिय आणि शांतताप्रिय नेतृत्व, कामगार नेता, कुटुंबवत्सल पिता आणि पती, स्वातंत्र्ययोद्धा, सक्षम आणि सुजाण राजकारणी या आणि इतर अनेक रूपांनी स्वतःचे अद्वितीयत्व सिद्ध केलेले स्व जनार्दन भगत हे जन्मदाते म्हणून आम्हाला लाभले हे आमचे भाग्य आहे. त्यांचा आदर्श आणि शिकवण हेच आमचे भांडवल आहे. या भांडवलावर फक्त आम्हीच नव्हे....तर या पंचक्रोशीतील लाखो लोक प्रेरित होऊन आबांच्या जीवनकार्यात अपूर्ण राहिलेल्या कार्याला पूर्णत्वाकडे नेत रहातील याची मला खात्री आहे आणि त्यासाठीच कायम प्रयत्नशील रहाण्याची जिद्दही आहे....हे स्वतःला आणि आबांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या सर्व समाजधुरिणांना पटवून देण्याची संधी मिळत रहावी यासाठी आबांची पुण्यतिथी हा न चुकता पार पाडण्याचा आध्यात्मिक दृष्टिकोनातून धार्मिक वाटणारा पण मानवी दृष्टिकोनातून सामाजिक आणि सामान्य जनतेला ऊर्जादायी ठरणारा हा उपक्रम आम्ही सर्वजण, मनाला कितीही वेदना होत असल्या तरी आग्रहाने करतो.... यामागेही आबांचे लोकविलक्षण कार्य हीच प्रेरणा आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने (दि. ०७ मे )आपण त्यांचे आणि त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या आत्म्यास चिरंतन शांती लाभावी आणि दुरितांचे उत्थान व्हावे या हेतूने त्यांच्या दैवी गुणांची धारणा काही अंशी आपल्या ठायी अस्तित्वात यावी यासाठी प्रयत्नशील रहाण्याचा संकल्प करणे आणि त्याचहेतूने त्यांचे आवाहन करणे हे आपले सर्वांचेच आद्य कर्तव्य आहे.

**- श्री संजय जनार्दन भगत**
**संचालक**
**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळ, पनवेल**

## शेतकऱ्यांवर केलेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ नेवासा तहसीलवर काँग्रेस व विविध संघटणाचा मोर्चा*

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी) :-** पुरंदर विमानतळास जमिनी देण्यास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यावर लाठीचार्ज करणाऱ्या महायुती सरकारचा आज नेवासा येथे काँग्रेस व विविध संघटनाकडून जाहिर निषेध करण्यात आला.

पुरंदर विमानतळास येथील स्थनिक सात गावांचा प्रखर विरोध असून एकतपूर या गावात पुरंदर विमानतळ जमिनीसाठी ड्रोन सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या सरकारी यंत्रनेस स्थानिक शेतकऱ्यांनी शांततेच्या मार्गाने विरोध केला. आम्ही आमच्या जमिनी विमान तळास देणार नाही, सर्वेक्षण बंद करा अशी ठाम भूमिका येथील स्थानिक शेतकऱ्याकडून घेण्यात आली. याठिकाणी रस्त्यावर गाडी बैलासह पूर्ण गावाकऱ्यांनी आंदोलन करत विरोध दर्शवीला परंतु या विरोधास



पोलिसांकडून जोरजबरदस्तीने मोडून काढण्याच्या प्रयत्नात आंदोलनानी वेगळे वळण घेतले पोलिसांनी शेतकऱ्यांवर अस्त्रूधुराच्या नळकांड्या सोडत, स्थानिक शेतकऱ्यावर अमानुष लाठीचार्ज केला. या लाठीचार्जमध्ये शेतकरी महिलेने आपला जीव गमावला.तर शेकडो शेतकरी गंभीर जखमी झाले. पोलिसांनी केलेल्या या लाठीचार्जचा महाराष्ट्रभरातील शेतकऱ्यांकडून निषेध करण्यात आला.आज नेवासा तालुक्यात काँग्रेसकडून शेतकऱ्यांवर झालेल्या लाठीचार्ज घटनेचा निषेध करण्यात आला यावेळी सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी सत्ता आल्यावर पूर्ण कर्जमाफीची घोषणा करणारे कर्जमाफी दूरच आता शेतकऱ्याच्या जमिनी हिसकावून घेत आहे. राज्यातील महायुतीचे सरकार हिटलरशाही सरकार असून कुठल्याही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी यांच्यापुढे झूकू नये.

शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी काँग्रेस पक्ष शेतकऱ्याच्या पाठीशी ठाम असून पोलिसांना शेतकऱ्यांवर लाठीचार्जचे आदेश देणारे कोण होते हे सर्व महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे.लाठीचार्ज करणारे पोलीस जनरल डायर पेक्षाही क्रूर असून यांना निलंबित केलेच पाहिजे. असे स्पष्ट मत व्यक्त केले. शेतकरी संघटनाचे त्रिंबक भदगले यांनी महाराष्ट्रातील सर्व शेतकरी बांधव व शेतकरी संघटना या पुरंदच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांनी या जुलमी सरकारला उखडून फेकावे असे स्पष्ट केले. स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे यांनी पुरंदर घटनेचा जाहीर निषेध करत याविरोधात पूर्ण महाराष्ट्रभर निदर्शने करण्याचा ईशारा दिला. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अशोकराव काळे यांनी शेतकरी सरकारला धडा शिकविल्याशिवाय गप्प बसणार नाही असा इशारा दिला, तसेच यावेळी बसपाचे हरीश चक्रनारायण, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे, मराठा संघांचे गणेश झगरे, आदिनी मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष अण्णासाहेब पटारे, ऍड. सागर सागडे, ऍड. ज्ञानेश्वर शिरसाठ, ऍड. बाबासाहेब कावले, गुलाबभाई पठाण, संजय होडगर, युसूफ शेख, विजय शिंदे, दिगंबर आवारे, शेषराव गव्हाणे, दत्तात्रय निकम,असिफ पटेल आदिसह शेतकरी उपस्थित होते. यावेळी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले.




## शेतकऱ्यांचे वाली कोण, ना पदाधिकारी ना अधिकारी, तीन दिवसापासून वरूडचे दोन्ही ट्रान्सफॉर्मर बंद

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** तालुक्यातील वरुड जहांगीर येथील बंजारा वस्तीला एक सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर दिले आहे तर पंपासाठी एक वेगळा ट्रान्सफॉर्मर दिला असून या सिंगलफेज ट्रान्सफॉर्मरवर बंजारा वस्तीतील घरगुती विद्युत पुरवठा आणि एक पीठ गिरणी चालत असून दुसऱ्या ट्रान्सफॉर्मरवर शेतातील विहीरीवर पंप सुरू असून दोन्ही ट्रान्सफॉर्मरवर कामापेक्षा जास्त भार असल्याने नेहमीच हे ट्रान्सफॉर्मर जळून जातात आणि गावकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अशातच या तांडा डीपीचे दोन्ही ट्रान्सफॉर्मर दोन तीन दिवसापासून बंद पडले असल्याने संपूर्ण गावातील विद्युत पुरवठा खंडित झाला असून घरातील लाईट बंद पडले असून घरातील पाण्याच्या मोटारी बंद असल्याने मानसाचे जनावरांचे पाण्याचे हाल होत असून वातावरण खूप आहे ,कुलर पंखे बंद असल्याने लहान मुलांना वयोवृद्ध व्यक्तींना आजारी लोकांना खूप त्रास सहन करावा लागत असून या बाबतीत ग्राम पातळीवर काम करणारे कर्मचारी कपिल नहाते यांना सांगितले असता त्यांनी मी वरीष्ठाना माहिती दिली असल्याचे सांगितले. अशातच शेतकऱ्यांना सुद्धा शेतातील लावलेली पिके, बागायती नष्ट होण्याची भिती वाटत असून अधिकाऱ्यांना कळविले असताना सुद्धा आज दिनांक ०५-०५-२०२५ पर्यंत कुठल्याही प्रकारचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले नसून यावरून निश्चितच लक्षात येते की सामान्य जनता, शेतकरी यांचा वाली ना संबंधित अधिकारी ना पदाधिकारी असल्याचे खरेदी विक्री संघाचे संचालक श्रावणसिंग वडते सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## वशेणी गावाचा उरणकरांच्या मैदानासाठी लढ्यात सक्रिय सहभाग राहील.. संदेश गावंड

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

**वशेणी येथील स.रा.पाटील** यांच्या घरासमोर येथे झालेल्या गाव बैठकीमध्ये गावातील कार्यकर्ते संदेश गावंड आपली भूमिका मांडतांना म्हणाले की, तालुक्यात मैदानासाठीचा आवाज ऐकत आहोत आता आम्ही सुध्दा या लढ्यात उतरणार असल्याचे जाहीर करत आहोत. प्रास्ताविकात मच्छिंद्र म्हात्रे यांनी उरण आंदोलनात रायगड भूषण प्रा एल बी पाटील यांच्या मार्गदर्शनात कोमसापचे कवी कवितांच्या जागरातून १९ मे पर्यंत जनजागृती करणार आहोत, हे सांगितले. द्रोणागिरी स्पोर्टसचे अध्यक्ष महादेव घरत यांनी आपण सिडकोकडे मागील २५ वर्षे उरणकरांसाठी मैदान मागत आहोत,आता थांबणार नाही, कोमसापच्या कवींनी जोर धरल्याने मैदान मिळेपर्यंत हे आंदोलन चालूच राहिल.असे ठासून सांगितले.

ज्येष्ठ कवी अजय शिवकर, न.ग.पाटील,म.का, म्हात्रे,अनंत पाटील, यांनी जागर भरला आणि रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी आगरी बोलीत पसायदान सादर केले. यावेळी पुरुषोत्तम पाटील, अनंत तांडेल, भक्तीकुमार ठाकूर, बळिराम म्हात्रे,पुरण पाटील,राम म्हात्रे,सौ.सुरेखा घरत, देविदास पाटील इत्यादी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.




## अज्ञात व्यक्तींकडून पैशाची मागणी; आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस ठाण्यात केली तक्रार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नावाने अज्ञात व्यक्तींकडून अनेकांना फोन करून पैशांची मागणी करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तातडीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.



आमदार प्रशांत ठाकूर यांचे नाव वापरून काही अज्ञात व्यक्ती व्यक्तींना फोन करून पैशांची मागणी करत असल्याचे निदर्शनास आले. दूरध्वनी करणारे व्यक्ती पंजाबी भाषेत बोलत होते आणि आमदार ठाकूर यांच्या नावाचा गैरवापर करून पैसे मागत होते. ज्या नागरिकांना संशय आला, त्यांनी या व्यक्तींना जाब विचारताच त्यांनी फोन बंद केला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार ठाकूर यांनी तातडीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, ३ मे रोजी मला माझ्या नावाने पैशांची मागणी करणारे फोन आल्याची माहिती मिळाली. फोन करणारे पंजावी भाषेत बोलत होते आणि माझ्या नावाने पैसे मागत होते. दूरध्वनी आलेल्या व्यक्तीने शंका व्यक्त करताच त्यांनी फोन बंद केला. त्यामुळे सावधगिरी म्हणून मी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. माझ्या नावाने इतर कोणाला फोन आल्यास मला कळवा किंवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.




## ट्रेलरखाली आल्याने तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, दि.6 (वार्ताहर)**

: ट्रेलरचे चाक बदली करण्याचे काम करण्यासाठी ट्रेलरच्या चाकाखाली गेलेल्या तरुणाच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना कळंबोलीतील आर. के. गॅरेजमध्ये घडली. कळंबोली पोलिसांनी या घटनेतील ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याल ताब्यात घेतले असून ओमकार सत्रे (18) असे त्याचे नाव आहे. तर, या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या तरुणाचे नाव मोहम्मद आले शेख (19) असे आहे. ओमकार हा ट्रेलरचे चाक बदली करण्यासाठी कळंबोलीतील फूड - लँड ब्रिजजवळील गॅरेजमध्ये गेला - होता. यावेळी गॅरेजमध्ये काम - करणारा मोहम्मद या ट्रेलरच्या - डाव्या बाजूचे पाठीमागील पहिली दोन चाके काढून त्या ठिकाणी नवीन चाके बसवली. त्यानंतर तो ट्रेलरच्या खाली लावण्यात आलेला जॅक काढण्यासाठी ट्रेलरच्या खाली गेला असताना ओमकार सत्रे याने ट्रेलर चालू केला. त्यामुळे ट्रेलरचे चाक मोहम्मदच्या अंगावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला व काही वेळातच त्याचा मृत्यू झाला.

## डंपरच्या चाकाखाली आल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल येथून आपटा येथे जाणाऱ्या स्कूटीला डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात स्कूटीचालक डंपरच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी मुंबई-गोवा महामार्गावर आपटा फाटा येथे घडली. परशुराम गंगाराम वाघमारे (28) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव असून, तो आपटा फाटा पनवेल येथील पठारे फार्महाऊस येथे राहत होता. परशुराम पनवेल येथे आला होता. त्यानंतर सायंकाळी तो पनवेल येथून स्कूटीवरून आपटा फाटा येथे जात असताना आपटा फाटा येथे भरधाव डंपरने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात परशुराम दुचाकीवरून खाली पडला व डंपरच्या चाकाखाली आल्याने तो गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर पनवेल तालुका पोलिसांनी डंपरचालक राजकुमार महातो (37) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पहिले लग्न लपवून तरुणीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास अटक

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

आपले पहिले लग्न झाले असताना हे सत्य लपवून दुसऱ्या एका तरुणीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर न लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलिसांनी 34 वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा नोंद करून त्याला अटक केली आहे. शशांक रत्नाकर म्हात्रे (34) असे त्याचे नाव आहे. शशांक याने काही महिन्यांपूर्वी पीडित तरुणीसोबत मैत्री करून प्रेमसंबंध निर्माण केले. दरम्यान, त्याचे लग्न झाले असल्याची बाब त्याने या तरुणीपासून लपवत तिला लग्नाचे आमिष दाखवून तिला स्वतःच्या घरात व अलिबाग, अक्कलकोट अशा विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर एके दिवशी तिने शशांकचा मोबाईल फोन तपासला असता त्याचे लग्न झाल्याची सत्यता तिला समजली. त्यामुळे पीडित तरुणीने त्याला याचा जाब विचारला असता, त्याने तिला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणात शशांकने आपली फसवणूक केल्याने पीडित तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी शशांक म्हात्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गोविंदपूर करांचे पाण्यासाठी भटकंती ! प्रशासनाचे दुर्लक्ष

### टँकर उपलब्ध करून देण्यास उशीर का?

### जलजीवन मिशनचे काम थांबून आहे

दैनिक युवक आधार
घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)



घाटंजीः- तालुक्यातील गोविंदपूर येथे तीन महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. घोटभर पाण्यासाठी वणवण करत ग्रामस्थांना पाणी शोधावे लागत आहे. हंडाभर पाण्यासाठी सुरू असलेली भटकंती थांबविण्यासाठी प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. तालुक्यातील गोविंदपूर या ठिकाणी ऐन उन्हाळ्यात गेल्या तीन महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे. पंचायत समिती व तहसीलदार लक्ष देऊन टँकर उपलब्ध करून देणे गरजेचे होते मात्र अद्याप तसे झाले नाही. पाऊसाळा सुरू झाल्यानंतर टँकर उपलब्ध करून देणार का असा प्रश्न आता नागरिक करत आहे. पाण्यासाठी ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे. आपल्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने ग्रामस्थ हवालदिल झाले आहेत. गोविंदपुर या गावात नेहमीच पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते. त्यातच गावाला पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था नसल्याने उन्हाळ्याच्या चार महिन्यांत पाण्याची तीव्र टंचाई भासते. यावर्षी पाण्याची कमतरता असल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे. या संकटातून बाहेर पाडण्याचे प्रशासनाला जमत नसल्यामुळे मात्र त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसल्याने प्रश्न अधांरीतच आहे.

टँकर प्रस्ताव पाठवला आहे, जिल्हाधिकारी कार्यालयात.
**(तहसीलदार, विजय साळवे)**
**प्रस्ताव पाठवला आहे**
**(गटविकास अधिकारी, गजानन पिल्लेवाड)**

# अहिल्यादेवी होळकरांच्या स्मरणार्थ राज्यात एकल महिला सर्वेक्षण व्हावे

## सरकार कडे साऊ एकल महिला समितीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**आष्टी प्रतिनिधी**

अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होते आहे. सरकारही त्यांना अभिवादन करण्यासाठी थेट मंत्रिमंडळ बैठक त्यांच्या जन्मस्थानी करते आहे. यानिमित्ताने सरकारने एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम घ्यायला हवा. अहिल्यादेवी या एकल महिला होत्या. एक एकल महिला किती मोठे कर्तृत्व गाजवू शकते याचे त्या वस्तुपाठ आहेत.एकल महिलांसाठी त्या प्रेरक आहेत. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ एकल महिला पुनर्वसन धोरण व्हावे, अशी मागणी हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संत सावता महाराज बहुउद्देश सेवाभावी संस्था रुई नालकोल अध्यक्ष सुरेश गांजुरे यांनी केली आहे महाराष्ट्रात आज विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे. या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी, सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांचे स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल.

एकल महिलांची संख्या किती असू शकते ?

देशाच्या २००१ च्या जनगणनेत एकल महिला ५ कोटी तर २०११ साली ७ कोटी ३० लाख होत्या. महाराष्ट्रात आज ही संख्या प्रचंड असू शकते याचा एक पुरावा देत आहे..

अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान ज्या अहिल्यानगर जिल्ह्यात आहे. त्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर एकल महिलांचे सर्वेक्षण केले. तेव्हा फक्त ग्रामपंचायत स्तरावर या एकल महिलांची संख्या १ लाख ७ हजार निघाली. त्यात १५ तालुक्यातील नगरपंचायत, नगरपालिका,




महापालिका ही संख्या मिळवली तर ती संख्या २ लाख असू शकते...ही एका जिल्ह्याची स्थिती आहे.

जर एका जिल्ह्यात दोन लाख एकल महिला असतील तर राज्यात ३६ जिल्ह्यात एकल महिलांची संख्या ७० लाखापेक्षा जास्त असू शकते आणि पुणे,मुंबई,नागपूर,संभाजीनगर सारख्या मोठ्या शहरातील मोठी संख्या बघता एकूण संख्या ८० लाखापेक्षा जास्त असू शकते. त्यांच्यावर अवलंबून असणारी दोन मुले धरली तर राज्याच्या लोकसंख्येत ही खूप लक्षणीय असेल... शेतकरी आत्महत्येत मृत्यू झालेले ५० हजार शेतकरी (अपात्र आत्महत्येची संख्या अजून जास्त ) कोरोनात महाराष्ट्रात झालेले सर्वात जास्त मृत्यू आणि दारूने गावोगावी मोठ्या संख्येने मरणारे तरुण बघता ही एकल महिलांची संख्या खूप वाढली आहे..

त्यामुळे एकल महिलांच्यासाठी धोरण तयार करण्यासाठी शासनाने सुरुवात म्हणून राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण करून अहिल्यादेवी
यांच्या स्मरणार्थ भरीव कृती करावी. हे सर्वेक्षण करण्यासाठी फार खर्च ही येणार नाही. ग्रामपंचायत क्षेत्रात त्या छोट्या गावात ग्रामसेवक,अंगणवाडी सेविका,आशा सेविका यांच्याकडे गावातील एकल महिला माहिती असतेच. ती फक्त वयोगटानुसार संकलन करायची आहे. शहरी भागात वॉर्ड ऑफिसर ,अंगणवाडी व स्वयंसेवी संस्था मदत करू शकतील व एकल महिलाना नोंदणीसाठी app द्वारे आवाहन करता येईल...


त्यामुळे हा कमी खर्चात होणारा सर्व्हे आहे... आज आपल्या आजुबाजूला असलेल्या या लाखो भगिनी असूनही लक्षात येत नाहीत... अदृश्य असलेला हा प्रश्न संख्या पुढे आली की दुष्यमान होईल व सरकार व समाज यांच्यासाठी नक्कीच काही करू शकेल... त्यामुळे अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्त एकल महिलांच्या प्रश्नावर सर्वेक्षणाची घोषणा सरकारने करून कृतिकार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी संत सावता महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था रुई नलकोल तालुका आष्टी जिल्हा बीड अंतर्गत साऊ एकल महिला समितीने केली आहे.

## *श्री लखाजी महाराज कनिष्ठ महाविद्यालय झाडगाव ची प्रतीक्षा खंडाळकर तालुक्यात प्रथम*









**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव :- तालुक्यातील झाडगाव येथील शिक्षण विभाग अमरावती वर्ग 12 वी निकाल काल दुपारी एक वाजता घोषित झाला. श्री लखाजी महाराज कनिष्ठ महाविद्यालय झाडगाव चा वर्ग बारावीचा निकाल 86.20 टक्के असून राळेगाव तालुक्यात तिन्ही शाखेमध्ये कुमारी प्रतीक्षा खंडाळकर हिने 87.20 टक्के गुण घेऊन राळेगाव तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. तर कनिष्ठ महाविद्यालयातून द्वितीय क्रमांकाने प्रज्वल रेंगे 75.60 टक्के , तृतीय क्रमांक कु.श्रद्धा आत्राम 75.20 टक्के गुण घेऊन कॉलेजमधून तिसरा क्रमांक पटकाविला. अशा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष श्री. दिलीपराव कोल्हे, उपाध्यक्ष आशिष दादा कोल्हे, सचिव रोशन दादा कोल्हे, सहसचिव भरतभाऊ पाल तथा संचालक चित्तरंजनदादा कोल्हे, दिलीपराव देशपांडे, शशीशेखरजी झाडे ,गुलाबराव महाजन,सुरेशभाऊ गंधेवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तर कनिष्ठ महाविद्यालयात काम करणारे प्रा.सौ. कुंदा काळे, प्रा.श्री रंजय चौधरी , प्रा.सौ वंदनाताई वाढोणकर तसेच शाळेचे इतर शिक्षक वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले शेवटी प्राचार्य श्री विलास निमरड यांनी या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अशा सत्कार प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या पुण्यतिथी निमित्ताने बुधवारी विविध समाजोपयोगी कार्यक्रम

### "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार, गुणिजनांचा सन्मान आणि सांस्कृतिक कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने बुधवार दिनांक ०७ मे २०२५ रोजी सायंकाळी ०६ वाजता उलवे नोड मध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५"चे बक्षिस वितरण तसेच शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणिजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ त्याचबरोबरीने "मराठी पाऊल पडते पुढे" या सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमे होणार आहेत.

या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती लाभणार असून समारंभ अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, सभासद वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.



जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. स्वर्गीय भगतसाहेबांनी अहोरात्र आपला देह 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबदल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्र्य व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामूळेच होऊ शकते हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या अंतःकरणात कायम होती. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यामुळे भगतसाहेबांची कीर्ती अजरामर राहिली आहे. त्यांची जयंती फेब्रुवारी लीप महिन्यामुळे दर चार वर्षांनी असते. त्यावेळी जयंतीनिमित्त राज्यात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीला त्यांच्या नावे बहुमानाचा पुरस्कार दिला. जातो. तर दर वर्षी पुण्यतिथीलाही सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करत भगतसाहेबांच्या स्मृतीला अभिवादन करत युवा पिढीला प्रेरणा देण्याचे काम केले जाते. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्व असते.

# राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर प्रतिनिधित्व करणाऱ्या कु.आकांक्षा गायकवाड यांचा गौरव

### "पंतप्रधान राज्यपाल मुख्यमंत्री व केंद्रीय व राज्य मंत्री यांच्या समवेत दिल्ली,मुंबई,नाशिक, गडचिरोली येथे केले प्रतिनिधित्व"

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

**वाशिम;** दि. 5 मे, स्थानिक श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय वाशीम येथील बी.एस.डब्ल्यू भाग ची विद्यार्थिनी कु आकांक्षा ज्ञानबा गायकवाड यांनी युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र वाशीम यांच्या माध्यमातून विविध राष्ट्रीय राज्य शिबिरामध्ये देशाचे पंतप्रधान सन्माननीय नरेंद्रजी मोदी राज्याचे मा.राज्यपाल रमेश बेस, मा.एकनाथ शिंदे, मा.देवेंद्रजी फडवणीस,केंद्रीय खेळ मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय खेल राज्यमंत्री नितेश प्रामाणिक, नेहरू युवा केंद्र राज्य समन्वयक प्रकाश मनोरे, राज्य संपर्क अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र राज्य डॉ.निलेश पाठक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलूपगुरु डॉ. मिलिंद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.निलेश कडू, यांच्यासह दिग्गज




मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रतिनिधित्व केल्याबद्दल कु आकांक्षा गायकवाड यांचा राष्ट्रीय सेवा योजना पथक व श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयाकडून दीक्षांत समारोप आयोजित कार्यक्रमांमध्ये तिचा शाल श्रीफळ सलमानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कु.आकांक्षा गायकवाड यांनी सन 2023- 24 देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या उपस्थितीमध्ये दिल्ली येथे व मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, सांस्कृतिक मंत्री आणि उच्चतंत्र शिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये मेरी मिट्टी मेरा देश या कार्यक्रमांमध्ये वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. नाशिक येथे संपन्न झालेल्या 27 व्या राष्ट्रीय युवा महोत्सव मध्ये आकांक्षा गायकवाड यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत पंतप्रधान मुख्यमंत्री व केंद्रीय खेल मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये. तर 2023- 24 मध्ये गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे आव्हान या राज्यस्तरीय राज्यपालप्रणीत शिबिरामध्ये राज्याचे राज्यपाल रमेशजी बैस यांच्या उपस्थितीमध्ये प्रतिनिधित्व करीत उत्कृष्ट कामगिरी केली. कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक शिबिराचे राज्यपातळी उत्कृष्ट चमू समूहामध्ये कार्य केले. या सह आकांक्षा ने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व वैयक्तिक सामाजिक आर्थिक,शैक्षणिक,राजनीतिक, पर्यावरण संवर्धन, वृक्षरोपण जलसंवर्धन,मासिकपाळी, महिला सक्षमीकरण, आरोग्य व रक्त दान शिबिर, मतदान जनजागृती, बालविवाह मुक्त भारत, गलिच्छ वस्ती, झोपडपट्टी अनुसूचित जाती जमाती अमरावती मेळघाट सारख्या आदिवासी मागास भागात कार्य करत आपले योगदान.दिले. तिला महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार राज्याचे शिक्षण व औषध प्रशासन मंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते मिळाल्याबद्दल. या सर्व कार्याची दखल घेऊन महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय साळवीकर तर प्रमुख पाहुणे सरस्वती समाजकार्य महाविद्यालय येथील प्राचार्य प्रा. डॉ. संदीप शिंदे व प्रा. डॉ. किशोर वाहने,प्रा. डॉ.संजय साळवे यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. या संपूर्ण कार्याबद्दल कु.आकांक्षा गायकवाड यांचे कौतुक श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड.किरण राव सरनाईक, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष डॉ.स्नेहदीप सरनाईक, यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकन्या सरकटे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आभार प्रदर्शन प्रा.पंढरी गोरे समन्व्यक विद्यार्थी विकास विभाग यांनी केले.

## जागतिक दमा दिन

दम्यासंबंधीत गैरसमजूती दूर करुन त्यामागची वास्तविकता जाणून घेणे गरजेचे
डॉ शाहिद पटेल, फुफ्फुसविकार तज्ज्ञ, मेडिकवर हॉस्पिटल्स, खारघर,

नवी मुंबई दरवर्षी मे महिन्याच्या पहिल्या मंगळवारी जागतिक दमा दिन म्हणून पाळला जातो. सध्या जगभरात दम्याचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. जागतिक दमा दिन हा संपूर्ण जगात दम्याबाबत जनजागृती करण्यासाठी, लोकांमध्ये या आजाराच्या उपचारांविषयी माहिती पोहोचवण्यासाठी, आणि दमा झालेल्या व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन आयुष्यात दम्याचा परिणाम कमी करण्यास मदत करण्यासाठी साजरा केला जातो.

दम्याविषयी असलेल्या गैरसमजूती

गैरसमज १- दमा हा केवळ लहान मुलांमधील आजार आहे
वास्तविकताः दमा बहुतेकदा बालपणात सुरू होतो, परंतु तो कोणत्याही वयात विकसित होऊ शकतो. प्रौढांमध्ये होणारा दमा हा सामान्यपणे आढळून येतो आणि त्यासाठी विशेष खबरदारी नियमित फॉलोअपची आवश्यकता आहे.

गैरसमज २ : सततच्या दम्याच्या औषधांचे एखाद्याला व्यसन लागू शकते
वास्तविकताः इनहेलर आणि इतर दम्याची औषधं ही व्यसन निर्माण करणारी नसतात. लक्षणे नियंत्रित करण्यासाठी आणि गुंतागुंत रोखण्यासाठी त्यांचा वापर करणे आवश्यक आहे. भीतीपोटी त्यांना टाळल्याने गंभीर गुंतागुंत होऊ शकते.

गैरसमज ३: दमा असलेल्या लोकांनी व्यायाम टाळावा
वास्तविकताः योग्य व्यवस्थापनाने, दमा असलेल्या व्यक्ती देखील सक्रिय जीवनशैलीचे पालन करु शकतात आणि खेळांमध्येही उत्कृष्ट कामगिरी बजावू शकतात. खरं तर, नियमित व्यायामामुळे फुफ्फुसांचे कार्य आणि एकूणच आरोग्य सुधारते.

गैरसमज ४: इनहेलर फुफ्फुसांना कमकुवत करतात
वास्तविकता : इनहेलर थेट फुफ्फुसांमध्ये औषधं पोहोचविण्याचे काम करतात, दुष्परिणाम कमी करतात आणि सूज कमी करतात, ज्यामुळे फुफ्फुसांचे संरक्षण केले जाते.

गैरसमज ५: दमा स्वतःहून निघून जातो
वास्तविकता : दमा हा एक जुनाट आजार आहे. योग्य व्यवस्थापनाने लक्षणं कमी होऊ शकतात, परंतु लक्षणांचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि फुफ्फुसांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

गैरसमज ६: दररोज इनहेलर वापरणे म्हणजे दम्याचे स्वरुप गंभीर आहे
वास्तविकता : इनहेलरचा दररोज वापर हा दमा नियंत्रित करण्यासाठी महत्त्वाचे ठरते. लक्षणं अधिक तीव्र होऊ नये याकरिता इनहेलरची मदत होते तसेच त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत टाळता येते.

गैरसमज ७: जेव्हा तुम्हाला बरे वाटेल तेव्हा तुम्ही दम्याची औषधांचे सेवन थांबवू शकता
वास्तविकता : वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधांचे सेवन थांबविल्याने लक्षणे अचानक बिघडू शकतात किंवा त्यांची तीव्रता वाढु शकते. उपचारांमध्ये बदल करण्यापूर्वी नेहमी पल्मोनोलॉजिस्टचा सल्ला घ्यावा. दमा हा काही एखाद्या व्यक्तीमधील कमकुवतपणा नाही तसेचती काही लाजिरवाणी बाब नाही. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही अशा रुग्णांवर यशस्वी उपचार करुन त्यांची पुरेपुर काळजी घेण्याचा प्रयत्न करतो. या जागतिक दमा दिनानिमित्त, दम्याविषयी असलेल्या गैरसमजूती आणि भीतीला अधुन ज्ञानाने दूर करण्याचा संकल्प करूया. जर तुम्हाला किंवा तुमच्या प्रियजनांना दम्याची लक्षणे दिसून आली, जसे की घरघर, श्वास घेण्यास त्रास होणे, खोकला येणे किंवा छातीत जडपणा तर विलंब न करता त्वरित तज्ञांचा सल्ला घ्या. योग्य मार्गदर्शन आणि उपचारांसह, दम्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन केले जाऊ शकते.

## बांठिया विद्यालयात 'मेहफिल ए सुखन' काव्य गजल संमेलन संपन्न



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया विद्यालय सभागृहात 3 मे रोजी मेहफिल ए सुखन काव्य गजल संमेलन पार पडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी 'ती माणसं गेली कुठे ?' या पुस्तकातील कविवर्य खावर यांच्या जीवनावरील लेखाचे अभिवाचन निलीमा काटके यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सादर केले. या कार्यक्रमात ललित कला कोकण साहित्य रत्न पुरस्कार ललित कला फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीप कारखानीस तसेच मंचावरील मराठी साहित्य क्षेत्रातील सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संमेलनाध्यक्ष प्रा. तुकाराम दादा पाटील यांच्या हस्ते साहित्यिक इकबाल शर्फ मुकादम यांनी स्विकारला. कार्यक्रमात रत्नागिरी येथील ज्येष्ठ पत्रकार, प्रकाशक राजेंद्रप्रसाद मसुरकर, बेळगावहून डॉ. यासीन सही त्रासगर आणि इतर मान्यवरानी आपले मनोगत व्यक्त केले, सभागृहात दर्दी गजलप्रेमींची उपस्थिती विशेष जाणवली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# गोदरेज कॅपिटलने पनवेलमध्ये नवीन शाखा सुरु

## पनवेल शाखा उलवे, खारघर, तळोजा आणि आजूबाजूच्या भागांमध्ये सेवा देणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
गोदरेज कॅपिटलची उपकंपनी असलेल्या गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडने पनवेलमध्ये नवीन शाखेचे उद्घाटन केले. विरारमध्ये पहिली शाखा आणि त्यानंतर पुणे पीसीएमसीमध्ये शाखा सुरु केल्यानंतर, कंपनीने महाराष्ट्रभर परवडणाऱ्या गृहवित्त सेवांवर लक्ष केंद्रित करत आपले स्थान बळकट केले आहे. ही नवी पनवेल शाखा उलवे, खारघर, तळोजा आणि इतर आजूबाजूच्या वाढत्या निवासी केंद्रांमध्ये स्वतःच्या मालकीचे घर असावे असे स्वप्न बाळगणाऱ्या ग्राहकांना अनुकूल गृहवित्तीय सेवा पुरवणार आहे. कंपनीचा मुख्य उद्देश म्हणजे परवडणाऱ्या किंमतीत स्वतःच्या मालकीचे घर मिळवून देणे. त्यासाठी कंपनी नोकरदार आणि स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना पाच लाख रुपयांपासून गृहकर्ज तीस वर्षापर्यंतच्या लवचिक कालावधीसह उपलब्ध करून देते. ही योजना स्वतःचे घर घेण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींना विश्वासार्ह आर्थिक आधार प्रदान करून परवडण्यासंदर्भात असलेली दरी कमी करण्यावर लक्ष केंद्रित करते. नवेल हे मुंबई-पुणे एक्सप्रेसवे आणि सायन-पनवेल हायवेच्या जवळ असून येथे जलद पायाभूत सुविधा विकास होत आहे. यामध्ये आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMI), नव्या मेट्रो प्रकल्पांचा समावेश आणि अटल सेतू ब्रिजसारखी कनेक्टिव्हिटी वाढवणारी कामे होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. सीमावर्ती बाजारपेठांतील वाढ आणि कनेक्टिव्हिटी सुधारल्यामुळे पनवेल हे गृहखरेदीदारांसाठी किफायतशीर आणि सोयीचे निवासी केंद्र म्हणून अधिकच आकर्षक ठरत आहे. गोदरेज कॅपिटल लवकरच महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये आणखी 9 शाखा सुरू करण्याची योजना आखत असून, उच्च-वाढीच्या बाजारपेठांमध्ये स्व मालकीच्या घराच्या संधी वाढवण्याच्या आपल्या दीर्घकालीन दृष्टीकोनाला चालना देत आहे.

शाखा उद्घाटन प्रसंगी, गोदरेज कॅपिटलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष शाह म्हणाले, "घर घेणे हे बहुतेक भारतीय कुटुंबांसाठी सर्वात मोठ्या स्वप्नांपैकी एक आहे आणि आम्ही ती यात्रा अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि सहजसोपी बनवण्यासाठी येथे आहोत. पनवेलमध्ये नवीन शाखा सुरु करून आम्ही केवळ शहरापुरते मर्यादित राहणार नाही, तर त्याच्या आजूबाजूच्या झपाट्याने विकसित होत असलेल्या शहरांमधील गृहखरेदीदारांनाही पाठिंबा देणार आहोत. हा विस्तार म्हणजे आवश्यक त्या ठिकाणी सानुकूलित, पारदर्शक आणि विश्वासार्ह वित्तीय उपाय सादर करण्यासाठीच्या आमच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे."

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-**
मार्च 2025 मध्ये झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल 100% लागला तर कला शाखेचा निकाल 95.23% लागला. महाविद्यालयाचा एकुण निकाल 98.99% इतका लागला असून महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतून प्रथम आर्या विश्वनाथ बहिर 89.00%, द्वितीय उदय निवृत्ती बावस्कर 88.67%, तृतीय संजीवनी विष्णू चापे 88.33% क्रमांक मिळविला. तर कला शाखेतून प्रथम प्रतीक्षा विष्णू साळवे 81.67%, द्वितीय राजू गणेश सुरडकर 76.33%, तृतीय शशिकांत तेजराव सुरडकर 76.17% क्रमांक मिळविला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर, सचिव डॉ राहुल पालोदकर, प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.








# सावर्डे येथे दुचाकी कठड्यावर धडकून स्वाराचा मृत्यू

दैनिक युवक आधार
चिपळूण वार्ताहर
सावर्डे ते दुर्गेवाडी मार्गावर काजचे वाकण येथे दुचाकी कठड्यावर धडकून वृद्धाचा मृत्यू झाला. मनोज नीलकंठ पोंक्षे (वय ७२, रा. पाग जोशीआळी, चिपळूण) असे मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. हा अपघात ५ मे रोजी सकाळी ९.०० वाजता घडला. याबाबतची तक्रार सायंकाळी १६.४५ वाजता चिपळूण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज पोंक्षे हे त्यांच्या स्कूटरवरून सावर्डेकडून दुर्गेवाडीकडे जात होते. काजचे वाकण येथील तीव्र उतारावर त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी



रस्त्याच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या कठड्याला जोरदार धडकली. या अपघातात त्यांच्या डोक्याला, तोंडाला आणि डाव्या खांद्याला गंभीर मार लागला आणि रक्तस्त्राव झाला. त्यांना उपचारासाठी डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी फिर्यादी संजय शांताराम कदम (वय ५०, रा. फुरुस कदमवाडी, ता. चिपळूण) यांनी चिपळूण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी मनोज नीलकंठ पोंक्षे (मयत) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सतत इयरफोन वापरल्यास कानाच्या त्रासात वाढ.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**
सध्याच्या काळात धकाधकीच्या जीवनात जो तो सतत मोबाईल मध्ये गुंग झाल्याचे दिसून येत आहे. कोणी मरगळ झटकण्याच्या अनुषंगाने किंवा उदास मन प्रसन्न करण्यासाठी तर कोणी आवड म्हणून मोबाईल द्वारे कानात इयरफोन लावून गाणे ऐकत असतो. आता तर फोनवर बोलणे सुद्धा इयरफोन द्वारे होऊ लागले आहे. लहानग्यापासून ते मोठ्यापर्यंत सर्व मोबाईलच्या आधीन झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या मोबाईलच्या आवाजामुळे दुसऱ्यांना त्रास नको म्हणून इयरफोनचा वापर केला जातो. परंतु इयरफोनचां सतत वापर धोकादायक ठरू शकतो. असे तज्ञाचे मत आहे. सतत कानात इयरफोन



वापरल्यास त्यामुळे कानावर परिणाम होऊ शकतो. वेळेप्रसंगी बहिरेपणा येण्याची शक्यता ही नाकारता येत नाही. इयरफोन द्वारे मोठ्या आवाजात गाणे ऐकले तर कानात वेदना होऊ शकतात. सातत्याने हाय इंटेन्सिटीमध्ये आवाज ऐकत असाल तर डोके दुखण्याचा आजारही होऊ शकतो. इयरफोनचा अधिक वापर केल्यास कानातील मळीचा व्याक्स जमा होऊ शकतो. ज्यामुळे कानात ब्लॉकेज किंवा अस्वच्छता होऊ शकते तसेच जर इयरफोन स्वच्छ नाही ठेवले तर त्यावर बॅक्टेरिया किंवा फंगल्स वाढू शकतात. ज्यामुळे कानामध्ये इन्फेक्शन होऊ शकते अशा कारणामुळे सतत इयरफोन वापरू नका असे आवाहन गोपाल श्रीराम बोरकर, मु,नंधाना ता,रिसोड जिल्हा वाशिम. यांनी केले आहे.

# त्रिदल सैनिक सेवा संघाच्या विदर्भ अध्यक्षपदी जगन्नाथ ठोंबरे यांची नियुक्ती.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड.. प्रतिनिधी**
**रणजितसिह ठाकुर**
त्रिदल सैनिक सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ अध्यक्ष पदी रिसोड येथील माजी सैनिक जगन्नाथ नारायण ठोंबरे यांची निवड नियुक्तीपत्राद्वारे करण्यात आली.संघटनेचे राज्यध्यक्ष संदीप लगड यांनी नियुक्ती पत्राद्वारे ठोंबरे यांची निवड केली.



जगन्नाथ ठोंबरे हे अतिशय शिस्त प्रिय आणि सामाजिक सलोखा जोपसणारे व्यक्तिमत्व आहे. माजी सैनिक जगन्नाथ ठोंबरे हे सैन्यदलात सेवेत असताना त्यांची शिस्त, कार्यशैली अनुभव व चारित्र्य व सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांची असणारी तळमळ व प्रशासनाकडे समस्याचा निपटारा करण्यासाठी केलेला पाठपुरावा इत्यादी बाबींचा विचार करुन त्रिदल सैनिक सेवा संघाचे अध्यक्ष संदीप लगड यांनी नियुक्तीपत्राद्वारे नियुक्ती केली. या नियुक्तीमूळे आजी माजी सैनिकांनी जगन्नाथ ठोंबरे यांचे स्वागत केले.

# "SYJC 2024-25 काळाचौकीत राज क्लासेसचा पुन्हा एकदा १००% निकाल!"

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**मुंबई ( काळाचौकी )**
येथील राज क्लासेसने आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखत यंदाही १००% निकाल मिळवण्याचा विक्रम केला आहे. यावर्षी एकूण २४५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते आणि सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.
संस्थेचे प्रमुख सीए राजू औटी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकवर्ग, पालक आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि समर्पण यामुळेच हे यश शक्य झाले, असे त्यांनी सांगितले.
या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवत संस्था व पालकांचे नाव उज्वल केले आहे. क्लासेसच्या टॉप 5 गुणवंत विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे:
१. पवनी आतळे (र. आ. पोद्दार कॉलेज ) ९३.६७%
२. कर्तिकी वामन ( लाला लाजपत राय कॉलेज ) ९३.५०%
३. राज कदम ( एस.आय. इ एस.कॉलेज ) ९२.८३%
४. साईश तांदेल ( एम. डी. कॉलेज ) ९०.१७%
५. मीनल कोयंडे ( रूपारेल कॉलेज ) ९०.००%
या यशाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. हे उत्तम निकाल राज क्लासेसच्या शिक्षणपद्धती आणि मार्गदर्शनाची साक्ष देतात.
राज क्लासेसने विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रम, टेस्ट सिरीज आणि वैयक्तिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावला आहे.
याशिवाय 80% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या 60 हून अधिक विद्यार्थ्यांनी या यशात भर घातली.
राज क्लासेसकडून सर्व विद्यार्थ्यांचे पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!
"शिक्षण हे केवळ गुण मिळवणे नसून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे," असे सीए राजू औटी यांनी सांगितले.




# अखेर अनसिंग पोलिसांनी अवैध दारू विरोधात सहा गावात केली विशेष कारवाई. 11710 रुपयाचा मुद्देमाल केला जप्त..

## अनसिंग पोलीस अक्शन मोडवर.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**
वाशिम जिल्ह्यातील वाशिम तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेले अनसिंग शहर व त्या अनसिंग शहराला लागून जवळपास 50 ते 52 खेडे आहेत.. सर्वात मोठी वाशिम जिल्ह्यात असलेली ग्रामपंचायत अनसिंग ची ओळख आहे तर त्या अनसिंग पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी खेडे. ग्राम टणका, वाई, वारला, कृष्णा उमरा, सोनगव्हाण, देगाव, येथे विविध कंपनीच्या विदेशी व देशी दारू गावठी हातभट्टी दारू एकूण किंमत 11710 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही सदर कारवाई मां पोलीस अधीक्षक, श्री अनुज तारे साहेब. यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक, नवदीप अग्रवाल, नीलिमा आरज अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमर चौरे . सहाय्यक एपीआय. राहुल शेजव. पोलीस उपनिरीक्षक मारोती



वंजारे महिला पोलीस उपनिरीक्षक कविता नागरे तसेच अनसिंग पोलीस स्टेशन ठाणेदार साहेबांचे रायटर अजय जायभाये. सतीश मुसळे, जगन्नाथ खंडारे, पोलीस अमलदार, अरविंद साबळे, किशोर सूर्यवंशी, दादाराव भोयर, गजानन चौधरी, भोलेनाथ फलटणकर, सुनील राठोड, महिला पोलीस अमलदार मनीषा वाघमारे यांच्या समवेत ही कारवाई केली.

# पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांचे पनवेल प्रेस क्लब कडून विशेष अभिनंदन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी :-** राज्य शासनाने शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा संदर्भात एक विशेष अभियान राबवले होते. यात राज्यातील महानगरपालिका गटामध्ये पनवेल महानगरपालिकेने उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यात तिसरा क्रमांक मिळविला त्याबद्दल पनवेल प्रेस क्लब कडून त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.
पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष देविदास गायकवाड, उपाध्यक्ष सागर पगारे, सचिव भागवत अहिरे, प्रसिद्धी प्रमुख किरण बाथम, राजेंद्र सदावर्ते, सुनील भुजबळ आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.
कौतुकाचे आभार आहे.पत्रकारांनी आमच्या उणीवा देखील आम्हाला सांगाव्यात.यशा मधून आम्ही हुरळून न जाता संयमाने अधिक कार्यरत राहू यासाठी आपले सहकार्य असावे ही अपेक्षा आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केली.
या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. यापुढेही गतिमान प्रशासन करण्याच्या दृष्टीने अशाच प्रकारे सातत्य टिकविण्यासाठी महापालिका कटिबध्द राहिल. असेही ते म्हणाले.

# जयस्वाल पेट्रोल पंप पारवा येथे पुन्हा अपघात ! तीन गंभीर जखमी

## संबंधित विभागाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका (प्रतिनिधी महेश पेंन्दोर)**
घाटंजीः पारवा सर्कल येथील जयस्वाल पेट्रोल पंप जवळ काही दिवसांपासून या धोकादायक ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच आहे. यात मंगळवारी झालेल्या अपघातात तीन गंभीर जखमी झाले आहे.
दिवसरात्र हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या मार्गावर या संबंधित विभागाच्या घोर दुर्लक्षामुळे हा जीवघेणा अपघात ओढवला, असा संतापजनक आरोप नागरिक करत आहेत. एकाच ठिकाणी मागील महिना भरात चार अपघात झाले आहे.अपघात झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या धोकादायक वळणावर योग्य उपाययोजना करण्याची मागणी वारंवार करण्यात आली, मात्र या संबंधित विभागाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. याच निष्काळजीपणाचा परिणाम म्हणजे दोन लोकांचे अपघातात निधन सुधा झाले आहे. पेट्रोल पंपाजवळ असलेल्या या धोकादायक वळणावर गतिरोधक (speed breakers) किवा स्पष्ट दिशादर्शक फलक लावण्याची साधी गरजही या संबंधित विभागाने पूर्ण केली नाही, यामुळे भरधाव वेगात येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नाही आणि ते अपघातांना वळी पडतात. आता दोन लोकांच्या मृत्यूनंतर तरी संबंधीत विभागाला जाग येणार का, ? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. परिसरातील नागरिकांनी तातडीने या जागेची पाहणी करून ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. केवळ दिखाऊ पाहणी न करता, तातडीने गतिरोधक बसवणे, योग्य सूचना फलक लावणे आणि आवश्यक असल्यास या धोकादायक वळणाच्या रचनेत बदल करण्याची मागणी जोर धरत आहे. दोन निष्पाप जीवांच्या मृत्यूनंतर तरी या संबंधित विभाग आपले डोळे उघडणार का? आणखी किती बळी गेल्यावर या 'मृत्यूच्या सापळ्या वर उपाययोजना केली जाणार? या गंभीर प्रश्नांची उत्तरे आता संबंधित विभागाला द्यावीच लागतील। निष्काळजीपणामुळे झालेल्या या दुर्दैवी घटनांसाठी जबाबदार कोण.? असा आक्रोश आता पारवा सर्कलमध्ये घुमत आहे.

# खारघर पोलीस ठाणे मध्ये दर्शनी भागात शासकीय सेवांचे फलक; आवारात फुलपाखरु बाग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
खारघर पोलीस ठाणे मध्ये येणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्कांची आणि शासकीय सेवांची माहिती सहजपणे मिळावी, या उद्देशाने लावण्यात आलेले शासकीय सेवांचे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. प्रत्येक पोलीस ठाणे नागरिकांसाठी एक महत्त्वाचे केंद्र असून, सार्वजनिक कायदा-सुव्यवस्था राखणारे तसेच गुन्ह्यांचा तपास करुन नागरिकांना मदत करणारे महत्वाचे ठिकाण आहे. दरम्यान, खारघर पोलीस ठाणे पनवेल तालुका हद्दीतील सर्वात जास्त लोकसंख्या असलेले पोलीस ठाणे आहे. खारघर शहरात सर्व जाती-धार्मिय नागरिकांचे वास्तव्य असून, खारघर शहरांची लोकसंख्या पाच लाखांच्या घरात आहे. खारघर पोलीस ठाणे मध्ये तक्रार दाखल करण्यासाठी, माहिती देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम या कायद्यानुसार त्यांच्या हक्कांची आणि शासकीय सेवांची माहिती सहजपणे मिळावी याकरिता खारघर पोलीस ठाणे मध्ये दर्शनी भागात लोकसेवेचे तपशील, विहित काल मर्यादात होणाऱ्या कामांची माहिती दर्शविणारे फलक लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे शासकीय अधिसूचित सेवेचे नाव, सेवेसाठी आवश्यक कागदपत्रे आणि सेवेचा कालावधी, याशिवाय राष्ट्रीय-राज्य मानवी हक्क आयोग अधिकार अटकेच्या कार्यवाही बाबत सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना देणारे माहिती फलक तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती, जमाती प्रतिबंधक तरतूदीचे माहिती देणारे फलक, सायबर फ्रॉड, आपत्कालीन प्रतिसाद, अंमली पदार्थ विरोधी हेल्पलाईन, मोफत विधी सहाय्यता केंद्र, माहिती अधिकार तसेच पोलीस अधिकाऱ्यांचे नाव आणि त्यांचे पद दर्शविणारे फलक दर्शनी भागात लावण्यात आले आहेत. खारघर पोलीस ठाणे मध्ये प्रवेश करताच नागरिकांचे दर्शनी भागात लावण्यात आलेल्या शासकीय सेवांची माहिती देणाऱ्या फलकांकडे लक्ष जात आहे. खारघर पोलीस ठाणे आवारात फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी बाग तयार करण्यात आली आहे. या बागेत फुलपाखरांना आवश्यक असलेल्या खाद्य आणि झाडांची लागवड करण्यात आली आहे. कोरांटी, पेटांस, कडीपत्ता, झेंडू, घोळ, जमैकन स्पाईक, मूसेंदा आदी विविध जातीच्या रोपांची लागवड खारघर पोलीस ठाणे आवारात करण्यात आली असून, या बागेबद्दल पर्यावरण प्रेमींकडून समाधान व्यक्त



केले जात आहे. खारघर पोलीस ठाणे मध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी बैठक व्यवस्था असून, नागरिकांसाठी पोलीस ठाणे मध्ये अधिसूचित सेवेचे नाव आणि त्यासाठी आवश्यक लागणारे दस्तऐवज, कालावधी आदी विविध शासकीय सेवांची माहिती देणारे फलक दर्शनी भागात लावण्यात आले आहेत. या फलकावरील माहिती नागरिक त्यांच्या मोबाईल मधील कॅमेऱ्यात चित्रित करत असतात. खारघर पोलीस ठाणे मध्ये येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे काम वेळेत करावे, अशी सूचना पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना देण्यात आली आहे. - दीपक सुर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खारघर पोलीस ठाणे.

# जे एम म्हात्रेंना ग्रामीण भागातून वाढता पाठिंबा!

## "पक्षप्रवेशाची तारीख दोन दिवस पुढे.."

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
शेतकरी कामगार पक्षाच्या वरिष्ठांकडून आपण केलेल्या मागणीची दखल घेतली जात नाही त्याबद्दल जाहीर पक्षाच्या मिटिंग मध्ये कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून पनवेलचे मा. नगराध्यक्ष श्री जे एम म्हात्रे यांनी नाराजी व्यक्त केली होती. 5 मे रोजी सकाळी कार्यकर्त्यांशी चर्चा करून श्री. जे एम म्हात्रे यांनी भाजप प्रवेश करण्याचे निश्चित केले. त्यानुसार सायंकाळी भरगच्च पत्रकार परिषद घेऊन त्यांनी दोन दिवसात म्हणजे 7 तारखेला भाजपा पक्ष प्रवेश करणार असे जाहीर केले. यानंतर अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधून आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत, आमच्या विभागातील बरेच कार्यकर्ते आपल्या सोबत भाजपा प्रवेशासाठी इच्छुक आहेत परंतु एक दिवसात सर्वांपर्यंत पोहोचणे शक्य होणार नाही. पनवेल, उरण , खालापूर मधील सर्व कार्यकर्ते आणि मित्र परिवाराशी संवाद साधणे गरजेचे आहे असे कार्यकर्त्यांनी सांगितले. आज तरुण पिढीच जास्त व्हाट्सअप वापरत आहे परंतु ग्रामीण भागातील भाऊंच्या सोबत काम करणारे जे जुने ज्येष्ठ सहकारी आहेत ते सर्वच व्हाट्सअप वापरत नाहीत. त्यांच्याशी संवाद साधून त्या सर्वांना सोबत घेऊन ग्रामपंचायत सदस्या पासून ते नगरसेवकांपर्यंत मोठ्या प्रमाणात सर्वांना घेऊन पक्षप्रवेश करणार आहोत असे श्री.जे एम म्हात्रे साहेब यांच्याकडून सांगण्यात आले.



> ग्रामीण भागातील बरीचशी माझी मंडळी माझ्याशी संपर्क करत आहेत, प्रत्यक्ष भेटत आहेत त्यामुळे मी पुढील दोन दिवसात पनवेल, उरण , खालापूर मधील माझ्या सर्व कार्यकर्ते आणि मित्र परिवाराशी संवाद साधून त्या सर्वांना घेऊनच पुढील 2 दिवसात भाजपामध्ये निश्चित पक्षप्रवेश करणार आहे.-
>
> **जे एम म्हात्रे, मा. नगराध्यक्ष**
> **पनवेल नगरपरिषद**

**नमुना एन डी**
**(नियम ९२(३) पहा)**
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH /46/CC/AUTO/2018/7382 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD2292 याचं तारीख 22/02/2023 रोजी निधन झाले आहे.
**मी सौ .**
**सुरेखा सुभाष राऊत**
**रूम नं-20 स्नेहदीप सो. प्लॉट नं-40, से-13, कळंबोली-panvel-410218**
उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.
याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.
**उत्तरआधिकारचे नाव-**
**सुरेखा सुभाष राऊत**
**रूम नं -20,स्नेहदीप सो, प्लॉट नं -40, से -13, कळंबोली -पनवेल -410218**

दखल

## देवीभोयरे येथील अंबिका विद्यालयाचा निकाल १०० टक्के




**निघोज :** देवीभोयरे येथील श्री अंबिका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इ.१२ वी निकाल १००टक्के.लागला असून विद्यार्थी पालक व शिक्षक यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

विद्यालयातील इयत्ता १२ वी ची विद्यार्थीनी कु. मयुरी सीताराम दाते विद्यालयात प्रथम ६०.६७टक्के तसेच *कु . आसावरी संतोष उबाळे ६०.००टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय आली आहे. तसेच संस्कार सुरेश सावंत ५९.१७टक्के तृतीय क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आहे. या विद्यार्थ्यांना प्राचार्य राजेंद्र वाघ , श्री बेलोटे सर,श्री हासे सर,उके मॅडम, शेख मॅडम ,शिंदे मॅडम, औटी मॅडम आदींचे मार्गदर्शन लाभले.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व जेष्ठ नेते शिवाजीराव जाधव तसेच सर्व संचालक मंडळ व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## देवगड येथे २३ मे पासून वारकरी बालसंस्कार शिबिर

**नेवासा :** तालुक्यातील श्रीक्षेत्र देवगड येथे मुलांवर चांगले संस्कार होण्याच्या उद्देशाने श्री दत्त मंदिर संस्थानच्या पुढाकाराने पंधरा दिवशीय निःशुल्क वारकरी बालसंस्कार शिबीराचे आयोजन२३ मे ते ६ जून या कालावधीत करण्यात आले असून या शिबिराची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

श्री समर्थ सदगुरू किसनगिरीबाबा यांच्या कृपाशीर्वादाने व राष्ट्र संत गुरूवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हे वारकरी बालसंस्कार शिबीर देवगड येथे होत आहे. १० ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश राहील. बाहेरगावच्या मुलांची राहण्याची सोय संस्थाच्यावतीने करण्यात आली असून मुलांनी अंथरूण-पांघरून तसेच ताट तांब्या बरोबर आणावे. सर्व मुलांना पांढरा गणवेश परिधान करणे बंधनकारक असून शिबीर काळात भजन, संस्कृत श्लोक, संस्कार प्रवचन शिकविण्यासाठी मान्यवर महाराज शिक्षकांची उपस्थिती रहाणार आहे. शिबीरामध्ये येतांना आपल्याला जे वाद्य शिकायचे आहे हे ज्याचे त्याने बरोबर घेऊन यावे अशा सूचना करण्यात आल्या आहेत

शिबिरामध्ये गायनाचार्य कीर्तनकार लक्ष्मण महाराज नांगरे, मृदंगाचार्य गिरीजानाथ महाराज जाधव, दादा महाराज साबळे, गणेश महाराज तनपुरे, शशिकांत महाराज कोरेकर, रोहीत महाराज पटारे, उमेश महाराज जाधव,अमोल महाराज बोडखे हे शिक्षक म्हणून मार्गदर्शन करणार आहे. ६ जूनला सकाळी ९ ते ११ या वेळेत भास्करगिरी महाराज यांच्या उपस्थितीत प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या कीर्तनाने शिबिराची सांगता होणार आहे.

## प्रवरा पब्लिक स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज प्रवरानगरच्या विज्ञान शाखेचा सलग अठरा वर्ष शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. बारावी बोर्ड परीक्षेत एकूण ७४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यामध्ये ४ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ५५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व उर्वरित १५ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले, अशी माहीती प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

सरोदे माहेश्वरी ८७.१७ टक्के गुण मिळून प्रथम, अर्ष शेख ८४.१७ टक्के गुण मिळून व्दितीय तर आदित्य रोकडेने ७७.६७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रंमाक मिळविला. उत्तीर्ण विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अण्णासाहेब म्हस्के, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे, भारत घोगरे, डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. प्रदीप दिघे आणि संचालिका लीलावती सरोदे यांनी अभिनंदन केले आहे.

## गटकळ विद्यालयाचा विज्ञान शाखेचे निकाल ९८.४३ टक्के

**टाकळीभान :** येथील एकनाथ गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा विज्ञान शाखेचा बारावी परीक्षेचा निकाल ९८.४३ टक्के लागला आहे. विद्यालयातील वेदांत थोरात या विद्यार्थ्याने ८४.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, कुणाल येवले या विद्यार्थ्याने ८३. ६७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर आदिती दरंदले या विद्यार्थिनीने ८१.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक पवन घोगरे, राजेंद्र गुजर, महेश शिंदे, हिना पटेल, परवेश शेख, ज्योती कोलते यांचे मार्गदर्शन लाभले असून या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक ॲड. भाऊसाहेब टेमक ॲड. सुरेखा टेमक व प्राचार्य कुदळे यांनी अभिनंदन केले आहे.

# शेतपाणंद रस्त्यांच्या निर्णयाने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

**लिंपणगाव :** शेतपानंद रस्त्यावरील सर्व प्रकारचे अतिक्रमण हटवण्यासाठी आता मोफत पोलीस बंदोबस्त मिळणार आहे त्यासंदर्भात ५ मे रोजी शासनाने तशा प्रकारचा अध्यादेश जारी केला आहे. त्यामुळे अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे रस्ते अडवणाऱ्याला मोठा चाप बसणार आहे. दरम्यान शेतीला आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत रस्ता उपलब्ध होण्यासाठी पाणंद रस्त्यांचे पुनरुज्जीवन महत्त्वाचे आहे. शेतापर्यंत जोपर्यंत रस्ता, वीज आणि पाणी व महत्वाची शेतीपूरक वाहने जात नाहीत; तोपर्यंत शेतकऱ्याची परिस्थिती सुधारणार नाही. यासाठी पाणंद रस्त्याची विशेष मोहीम राज्यभर राबवली जात आहे. या शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नसंदर्भात शेतपानंद चळवळीचे प्रणेते शरदराव पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी या शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात शासनाचे वेळोवेळी लक्ष केंद्रित केले होते संपूर्ण राज्यात शेतपानंद वहिवाटीचे रस्ते शेवटच्या शेतकऱ्यांना त्याच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ते खुले व्हावेत यासाठी या शेतपांनंद चळवळीने संपूर्ण राज्यात मोठी मोहीम राबवून अखेर शासनाला अध्यादेश काढण्यास यश मिळवले आहे.

शेत व पाणंद रस्त्यांचे अतिक्रमण काढताना तसेच सर्व प्रकारच्या रस्त्यांची मोजणी करताना शेतकरी बऱ्याचदा अडवणूक करतात.

**: शिवपानंद चळवळीच्या सातत्याने केलेल्या पाठपुरावाला राज्यात मोठे यश आले आहे. शेत पानंद रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी व सर्व प्रकारच्या रस्त्याच्या मोजणीसाठी आता मोफत पोलीस बंदोबस्त मिळणार असल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.**

याची दखल घेऊन यासाठी संरक्षण देण्याबाबत राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार राज्याच्या गृह विभागाने पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढताना व सगळ्या प्रकारच्या रस्त्यांची मोजणी करताना मोफत पोलीस बंदोबस्त देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, जे शेतकरी अशा प्रकारची अडवणूक करतील त्यांच्यावर कारवाई करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे. याचा लाभ राज्यातील शेती विकासासाठी मोठ्या प्रमाणात होणार आहे.

या निर्णय जारी करताना शिवपानंद शेत रस्ते चळवळ व राज्यातील समस्त रस्ता पिढीत शेतकरी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस; उपमुख्यमंत्री अजित दादा पवार; उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतपानंद चळवळीची व शेतकऱ्यांच्या रास्त भावना लक्षात घेऊन अखेर अध्यादेश जारी करून त्याची सखोल अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतल्याने अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी या मोहिमेस अखेर पर्यंत पाठपुरावा केल्याबद्दल शेतपानंद शेत रस्ते चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांचे कौतुक केले आहे.

## विधवा व ज्येष्ठांच्या समस्या समजून त्यांची मदत करणे गरजेचे : हनीफ शेख




**अहिल्यानगर -** समाजामध्ये आज प्रत्येकाला काही ना काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पण वयस्कर व त्यात पण विधवा महिलांच्या समस्या फार मोठ्या प्रमाणात आज निर्माण झाले आहे. त्यावर उपाय व त्यात पण विधवा ज्येष्ठांची मदत करण्याची आज अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन स्नेहालय बाल भवनचे हनीफ शेख यांनी केले.

अहमदनगर डिस्ट्रिक्ट मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने १०० विधवा महिलांना मदतीचे धनादेश हनीफ शेख यांच्या हस्ते मुस्लिम फाउंडेशनच्या कोटला येथील कार्यालयात वाटप करण्यात आले. याप्रसंगी फाउंडेशनचे इंजि. इकबाल सय्यद, डॉ. सईद शेख, हाजी मिर्झा आदी मान्यवर उपस्थित होते.

विधवांना मदतीचे उपक्रम अहमदनगर मुस्लिम वेल्फेअर फाउंडेशन मागील सोळा वर्षापासून सलग राबवत आहे.

हनीफ शेख पुढे म्हणाले की, आपल्या देशात विधवा व ज्येष्ठांचे भरपूर समस्या आहे. त्याकडे आपल्याला जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात घरच्याकडूनच ज्येष्ठांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे त्या बाबींचा उहापोह होत नाही व परिणामी ती व्यक्ती डिप्रेशन मध्ये जाते किंवा घरातून निघून जाते, आजारी पडते काहीही होऊ शकते म्हणून प्रत्येकाने आपल्या व समाजातील विधवा, ज्येष्ठांची देखभाल केली पाहिजे. त्यांच्याशी बोलत रहावे. त्यांची विचारपूस करायला हवी असे नमूद करून मुस्लिम फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन डॉ. सईद शेख यांनी केले. आभार हाजी मिर्झा यांनी मानले.

## श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १००टक्के

**अहिल्यानगर :** श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज एस.एस.सी व एच .एस. सी. चा निकाल प्रत्येक वर्षी१००टक्के लागण्याची परंपरा आहे. याही वर्षी उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) फेब्रुवारी- मार्च २०२५ चा निकालही १००टक्के लागला. संख्यात्मक व गुणात्मक असा हा उत्कृष्ट निकाल आहे. फेब्रुवारी मार्च २०२५ या परीक्षेला विद्यालयातून एकूण ७४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन उत्कृष्ट निका लाची परंपरा याही वेळी दिसून आली. ईश्वरी प्रवीण कडूस या विद्यार्थीतीस ८२.१७टक्के गुण प्राप्त झाले असून ती विद्यालयात प्रथम आली तर श्रेयस शर्मा, एकता तुपे, वैष्णवी पांडे, प्रेमराज सारदे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम क्रमांक पटकावला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व सत्कार सोहळा महर्षी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक कानडे, विद्यालयाचे एज्युकेशन डायरेक्टर नंदकिशोर भावसार, विद्यालयाच्या प्राचार्या तनुजा लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका . अरुंधती भोकरे, . स्नेहल महाजन, योगिता सोनकुसरे उपस्थित होत्या. त्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# रस्ता धुळीच्या विळख्यात; सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**श्रीगोंदा :**तालुक्यातील बेलवंडी शिरूर श्रीगोंदा रस्ता नगर पुणेमहामार्गाला जोडणारा हा प्रमुख रस्ता असून या ठिकाणी धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून सर्वसामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सध्या या रस्त्याचे काम जोरात सुरू असून रस्ता पूर्णपणे उखडल्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे . मोठे वाहने गेल्यानंतर दुचाकी स्वारांना अक्षरशः काही दिसत नाही, त्यात बस कंटेनर ट्रक्स गेल्यानंतर लहान गाड्यांच्या पुढे पूर्ण धूळ असते या धुळीमुळे दुचाकीस्वार आपली गाडी साईडला थांबवतात जी धूळ जाऊन डोक्यात डोळ्यात चरचर होणे . श्वसनाचे त्रास होत आहे .डोक दुखणे या गोष्टी घडत असून अपघाताला निमंत्रण देत आहेत . रस्त्याच्याबाजूला उभे राहिले तर मोठ्या गाड्या जोरात असल्याकारणाने रस्त्यावरचे दगड उडून लागल्याचे प्रकार घडत आहेत परंतु प्रशासनाचे याकडे पूर्णपणे



दुर्लक्ष होत आहे . या रस्त्याच्या कडेला काम चालू असल्या मुळे उखडलेला रस्ता कुठे खड्डा त्यामुळे वाहन चालकांना लवकर लक्षात येत नसल्यामुळे अनेक अपघात घडत आहेत . दुचाकीस्वार पडल्याचेही घटना घडलेले आहेत . या रस्त्यावर संबंधित ठेकेदारांनी पाणी मारणे गरजेचे असून या ठिकाणी पाहिजे त्या प्रमाणामध्ये पाणी न मारल्यामुळे धुळीचे साम्राज्य उदयाला आले आहे . पूर्ण रस्त्यावर दिवसभरात एक ते दोन टँकर फिरतात एक ते दोन टँकर फिरल्याने पाण्याची पूर्तता होत नसल्या कारणाने धुळीचे साम्राज्य वाढले असून अपघाताला निमंत्रण देत आहेत .जर या ठिकाणी दगड उडून अपघात झाल्यास याची नैतिक जबाबदारी प्रशासन स्वीकारेल का ? असा संतप्त सवाल नागरिक करत आहे.

या परिसरात शिरूर बाजारपेठ जवळ आहे . नागरिक दुचाकी वरून जातात परंतु सध्या रसत्याने धुळीचे प्रमाण वाढल्यामुळे एसटी बसने प्रवास करतात . परंतु श्रीगोंदा आगारातील बसेस संख्या कमी त्यात बहुतांशी गाडया रस्त्यात बंद पडलेल्या अवस्थेत या मार्गावर प्रवासी संख्या जास्त आहे . त्यामुळे नागरिकांना एसटीचा प्रवासाचा मनस्ताप सहन करावा लागत आहे यारस्त्यावर फेऱ्यांची संख्या वाढवावी अशीही मागणी होत आहे .

संबंधित ठेकेदारांना सुचना करून या ठिकाणी पाण्याचे टँकर वाढविण्यास सांगितले जाईल व रस्ता दुर्तफा उखडून ठेवल्यामुळे वहातुकीची कोडी कशी कमी करता येईल याच्या सुचना देण्यात येईल मी स्वतः या रस्त्याची पहाणी करणार आहे . एसटी बसेस मध्येही सुधारणा करण्याच्या सुचना देण्यात येतील जेणेकरून नागरिकांचा त्रास कमी होईल .

आमदार विक्रम पाचपुते

रस्त्याच्या कडेला असणाऱ्या घरांमध्ये अक्षरक्षा धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे, रस्ता पूर्ण होईपर्यंत या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या नागरिकांना घर सोडून दुसरीकडे जावे का असा प्रश्न यांनी निमित्ताने उपस्थित केला जात आहे . काम दोन वर्ष चालते का किती तोपर्यंत आम्ही कसे जगायचे याकडे लोकप्रतिनिधी सर्व सामान्य नागरिकांचा श्वास मोकळा करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे .

## वृद्धेश्वर कारखान्याचे उसाचे पेमेंट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग: राजळे

**तीसगाव :** वृद्धेश्वर साखर कारखान्याने यावर्षीच्या हंगामात गाळप केलेल्या संपूर्ण उसाचे २ हजार ७२३ रुपये प्रति मेट्रिक टनाप्रमाणे पेमेंट रक्कम दिली आहे.गाळपास ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकरी सभासदांच्या बँक खाती या पोटी ७० कोटी रुपये रक्कम जमा केली आहे, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष आप्पासाहेब राजळे यांनी दिली. वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल सुरू आहे. २०२५-२६ हंगामासाठी सहा लाख मे. टन गळिताचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे.

कारखाना कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ऊसलागवड होण्याचे दृष्टीने कारखाना शेतकी विभाग ऊस पीक परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करीत आहे. तसेच कारखाना कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त पीक उत्पादनासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भातील योजना विचारधीन आहे. कारखान्याचा आगामी गळीत हंगाम वेळेवर सुरू करण्यासाठी आवश्यक मशिनरी दुरुस्ती व देखभाल आदीचे कामकाज सुरु असल्याची माहिती संचालक राहुल राजळे यांनी दिली. कार्यक्षेत्र व कार्यक्षेत्राबाहेरील सभासद, ऊस उत्पादक शेतकरी २०२५-२६ च्या गळीत हंगामामध्ये संपूर्ण ऊस वृद्धेश्वर कारखान्याकडे नोंदणी करावी.सदरचा ऊस गळितास पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन उपाध्यक्ष रामकिसन काकडे व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सरोज आल्हाट

### निमगाव वाघा येथे १४ मे रोजी संमेलन; राज्यभरातील साहित्यिकांची उपस्थिती

**अहिल्यानगर -** निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन १४ मे रोजी करण्यात आले असून, या संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवयित्री व साहित्यिक सरोज आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता परिवार मंगल कार्यालय येथे या



संमेलनाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून, संमेलनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी गावातून काढण्यात येणार आहे.या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंतांचे परिसंवाद, व्याख्याने, कवी संमेलन, तसेच ग्रंथ प्रदर्शन यांचा समावेश असून, एक साहित्यिक पर्वणीच ठरणार आहे, अशी माहिती संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

संमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी भूषविणाऱ्या सरोज आल्हाट या गेली ३० वर्षे साहित्य, समाजसेवा आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत एतिहासिक बहुभाषिक कवी संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या मराठीत चार आणि इंग्रजीत एक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. पहिल्या ग्रामीण ख्रिस्ती साहित्य संमेलनातील काव्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषविले होते. साहित्य क्षेत्रातील अनेक मानाचे पुरस्कार देखील त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले आहे. आल्हाट यांची ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी गिताराम नरवडे, गझलकार रज्जाक शेख, भारत सातपुते, आनंदा साळवे, सुभाष सोनवणे, गुंफा कोकाटे, शंकर चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आपलं गाव फौंडेशनकडून वन्य प्राण्यांना पाण्याची सुविधा

**निघोज :** बाभुळवाडे गाव व परिसरातील पोहिमाळ या ठिकाणी असलेल्या शासकीय वनपरिसरात आपलं गाव फौंडेशनच्या माध्यमातून वन्य प्राण्यांना पाण्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी असलेल्या तलावात दररोज टँकरने पाणी उपलब्ध करून देणयाचा निर्णय घेण्यात आला असून या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक व स्वागत होत आहे.

सध्या उन्हाळा अत्यंत कडक असून पारनेर तालुक्यातील तापमानाची आकडेवारी दररोज वाढत आहे. दि.१ मे पासून सकाळी दहा वाजता ३८ ते दुपारी हीच आकडेवारी पाच वाजेपर्यंत ४३ तपमानापर्यंत जात असून मानसाला पाणी उपलब्ध होत आहे. मात्र वन्यप्राण्यांना पाणी उपलब्ध होत नाही. पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे गाव व परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून माणसांनाच पाणी नाही तर वन्यप्राण्यांना पाणी कुठुन उपलब्ध होणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र आपलं गाव फौंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश खणकर , सचिव प्रमोद जगदाळे, विश्वस्त कैलास खोडदे, विश्वस्त संतोष बोरुडे सर यांनी मदत केली आहे. तसेच त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मात्र बाभुळवाडा परिसरातील पोहिमाळ या ठिकाणी असलेल्या तलावात पाणी उपलब्ध करुन दिले आहे. पोहिमाळ हा असा एक परिसर आहे की त्याठिकाणी ससे, हरिण, मोर तसेच मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात असतात. पाण्याअभावी या ठिकाणी या वन्यप्राण्यांना सुरक्षीतता मिळावी त्यांना पाणी उपलब्ध होऊन त्यांना कोनत्याही प्रकारचचा नैसर्गिक अपाय होऊ नये यासाठी आपलं गाव फौंडेशनच्या माध्यमातून काळजी घेण्यात आली आहे. फौंडेशनच्या माध्यमातून



सातत्याने शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक तसेच विविध उपक्रम संपन्न होत असतात. बाभुळवाडे गावचे रहिवासी मुंबई,पुणे व राज्यातील विविध भागांत नोकरी व व्यवसाय माध्यमातून कार्यरत आहेत. ही सर्व ग्रामस्थ त्यांच्या लोकसहभागातून या फौंडेशनला आर्थिक सहकार्य करीत असतात.

## अश्लील चाळे करण्यास जागा उपलब्ध करुन देणाऱ्या ५ कॅफे चालकांविरुध्द गुन्हा

**अहिल्यानगर:**पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, यांनी शहरातील कॅफेची तपासणी करुन कायदेशीर कारवाई केली आहे.या कारवाईत कॅफेच्या नावाखाली तरूणांना अश्लील चाळे करण्यास जागा उपलब्ध करुन देणा-या ५ कॅफे चालकांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक ओला यांच्या आदेशान्वये पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोसई/तुषार धाकराव व पोलीस अंमलदार संदीप पवार, विश्वास बेरड, पंकज व्यवहारे, शाहीद शेख, गणेश धोत्रे, विजय ठोंबरे, शिवाजी ढाकणे, आकाश काळे, जालींदर माने, मयुर गायकवाड, भाग्यश्री भिटे, सारीका देरेकर, ज्योती शिंदे अशांचे पथक तयार करून अहिल्या नगर व भिंगार येथील कॅफेची तपासणी करून गैरप्रकार आढळल्यास कारवाई करणेबाबत सुचना व मार्गदर्शन करून पथकास रवाना केले.या पथकाने कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील १) नगर कल्याण रोडवरील द परफेक्ट कॅफे २) सारसनगर ते वाकोडी जाणारे रोडलगत बेलाचाव कॅफे तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीतील ३) सावेडी गावातील पंपींग स्टेशनजवळील ऑरिगेनो कॅफे ४) कोहिनूर मॉलजवळील झेडके कॅफे व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील ५) स्टेट बँक चौक, अहिल्यानगर येथील वननेस कॅफे अशा ठिकाणी पंचासमक्ष जावुन खात्री केली असता तरुण मुल मुली अश्लील चाळे करताना मिळुन आले. पथकाने वर नमूद कॅफे चालकास कॅफे चालविण्याचा परवाना बाबत विचारपुस करता त्यांनी कॉफी शॉपचा परवाना नसताना कॉफी शॉपचा बोर्ड लावुन कुठलीही कॉफी, पेय अगर खाद्यपदार्थ विक्रीस न ठेवता आतमध्ये मुलामुलींना बसण्यासाठी व अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले.

# एक लाख भाविकांनी घेतले श्री महालक्ष्मीदेवीचे दर्शन

**नेवासा :** तालुक्यातील श्री क्षेत्र वरखेड येथील श्री महालक्ष्मीदेवीच्या दर्शनासाठी मंगळवारी दि६ मे रोजी सुमारे एक लाख भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.''आई राजा उदो उदो''वरखेड माता की जय अशा जयघोषाने वरखेड नगरी दुमदुमली होती. वरखेड येथील श्री महालक्ष्मी देवीचे देवस्थान हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे नुकतीच वरखेड देवीची यात्रा ही लाखो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाली तरी देखील यात्रेनंतर लाखोंच्या संख्येने दर मंगळवारी व शुक्रवारी भाविक येथे दर्शनासाठी गर्दी करतात. मंगळवारी दि.६ मे रोजी देखील पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी येथे गर्दी केली होती पोतराजाने डफाच्या तालावर देवीची गाणे गात येथील वातावरण मंगलमय केले होते. भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून श्री महालक्ष्मी देवी मंदिर देवस्थानचे सचिव कडूबाळ गोरे पाटील, उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे, मंदिर विश्वस्त नवनाथ वाघ, रंगनाथ पवार, रामचंद्र कुंढारे, रावसाहेब कुंढारे, देविदास शिरसाठ, किशोर शिरसाठ, रामदास गोरे, भगवान जगधने, बाळासाहेब शिरसाठ, पोपट शिरसाठ, सुरेश शिरसाठ यांनी सेवेकऱ्यांची भूमिका बजावत स्वयंसेवकाची भूमिका बजावली. यात्रा झाल्यानंतर दर मंगळवारी व शुक्रवारी येथे भाविक दर्शनासाठी येतात व आपली नवसपूर्ती करतात मंगळवारी झालेल्या उत्सव प्रसंगी मंदिर प्रांगणात विविध दुकाने थाटल्याने यात्रेचे स्वरूप वरखेड नगरीला आले होते.यावेळी भाविकांनी रांगेत दर्शन घेत वरखेड मातेचा जयघोष केला.वरखेड देवी मंदिर देवस्थानच्या वतीने मंदिर परिसर विकासासाठी मदतीचे आवाहन देवस्थान स्ट्रस्ट च्या वतीने करण्यात



आलेआलेल्या मान्यवरांचे देवस्थानच्या वतीने श्रीफळ प्रसाद देऊन स्वागत करण्यात आले. शिवसेनेचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, नेवासा तालुक्यातील जेष्ठ शिवसैनिक बाळासाहेब जोंधळे व पत्रकार बाळासाहेब पंडित,अरुणा ताई कनगरे यांनी यानिमित्ताने भेट दिली असता देवस्थानच्या वतीने त्यांचा सचिव कडूबाळ गोरे पाटील व उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. देवस्थानच्या उत्कर्षासाठी येथील भाविकांसाठी सोई सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात तसेच रस्त्यांची झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी लोक प्रतिनिधी यांनी लक्ष घालावे अशी मागणी जेष्ठ शिवसैनिक कामगार नेते बाळासाहेब जोंधळे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना केली. मंगळवारी पहाटे पासूनच भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती रात्री उशिरापर्यंत गर्दीचा ओघ हा सुरूच होता. दिवसभरात सुमारे एक लाख भाविकांनी दर्शन घेतले असल्याचे श्री महालक्ष्मी मंदिर देवस्थानचे सचिव कडूबाळ गोरे पाटील व उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले

## कान्हूरच्या विद्याधाम हायस्कूलचे बारावीत घवघवीत यश

**पाबळ :** कान्हूर मेसाई येथील माध्यमिक विद्यालयाचा १२ वी विज्ञान व वाणिज्य शाखेचा १०० % तर कला शाखेचा ८८.२४ % तसेच व्यवसाय अभ्यासक्रम इले.टेक्नॉलॉजी शाखेचा ९४.४४ % निकाल लागला विद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवल्याची माहिती मुख्याध्यापक प्रा. विनोद शिंदे यांनी दिली.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा अविनाश दौंडकर,तुषार जाधव, रोहिणी पुंडे,प्रियांका डुबे, ऐश्वर्या ननवरे, सचिन कदम, दगडू दंडवते,अर्चना तांबे,माधुरी गोकुळे,दत्तात्रय खोडदे,मच्छिंद्र राऊत, सीताराम बनसोडे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे प्राचार्य विनोद शिंदे, पर्यवेक्षक मनोज धुमाळ,विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा अंजलीताई घोलप,सचिव सदाशिव पुंडे सर्व संचालक मंडळ कान्हूरचे सरपंच व उपसरपंच ग्रामस्थ, पालक आदींनी अभिनंदन केले.

## सुखदेव फुलारी अंनिसच्या सोशल मीडिया जिल्हा कार्यवाहपदी



**नेवासा :** नेवासा तालुक्यातील भेंडा येथील पत्रकार सुखदेव फुलारी यांची महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्हा प्रसिद्धि व सोशल मीडिया विभाग कार्यवाह पदी निवड झाली आहे. रविवार दि.४ मे रोजी सकाळी १० वाजता नगर येथील शार्दुल नर्सरी, नालेगाव येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शाखांचे कार्यकर्ते पदाधिकारी यांचा जिल्हा प्रेरणा मेळावा संपन्न झाला. त्यात समितीचे राज्य कार्यवाह बाबा आरगडे, राज्य प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे, राज्य सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे या राज्य निरीक्षकांच्या उपस्थितीत पुढील दोन वर्षांकरिता अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली.

## श्रीगणेश संकुलाच्या विद्यार्थ्यांची कौतुकास्पद कामगिरी

**कोपरगाव :** कोऱ्हाळे येथील श्रीगणेश शिक्षण संस्थेच्या श्रीगणेश कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा इयत्ता बारावीचा निकाल ९९.६९ टक्के लागला. निखिल येलमामे याने ८९.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, परमितसिंग पोथीवाल याने ८४.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर दिव्या हाळनोर ८३.५ गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय क्रमांक मिळविला,अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा.विजय शेटे यांनी दिली. या विद्यार्थ्यांचा संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष प्रा.विजय शेटे,उपाध्यक्ष संदीप चौधरी,सचिव नेमीचंद लोढा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी विश्वस्थ कामिनी शेटे,भरत शेटे,रवींद्र चौधरी,श्रीगणेश जुनिअर कॉलेज प्राचार्य प्रा.सागर हिंगे, उपप्राचार्य प्रा.योगेश फटांगरे, प्रा. प्रवीण दहे , प्रा. नंदलाल आहेर,प्रा. सुनील गोर्डे, प्रा.रियाज शेख,प्रा. बापू पुणेकर आदी उपस्थित होते.

## पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय नवीन ठिकाणी स्थलांतरीत

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :** प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), पनवेल हे कार्यालय 5 मे 2025 पासून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल,व्हॅली शिल्प को-ऑप. हौ.सो.,बिल्डिंग क्र. एच-1, दुसरा मजला,सेक्टर 36, खारघर नोड,ता. पनवेल, जि. रायगड – 410210 ई-मेल: RTO.46-MH@GOV.IN येथे नवीन ठिकाणी स्थलांतरित झाले आहे. नवीन पत्त्यावर सर्व व्यवहार सुरळीतपणे सुरु झाले असून नागरिकांना सर्व संबंधित कामांसाठी नवीन पत्त्यावरच संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंतकुमार पाटील यांनी केले आहे.

## प्रिय विद्यार्थी बंधू आणि भगिनींनो, यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

**(बारावी परीक्षा विशेष – 2025)**
"दैनिक युवक आधार – मराठवाडा आवृत्ती" यांच्या वतीने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! तुमच्या परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश तुमच्या मेहनतीचे परिणाम आहे. हे यश तुम्हाला भविष्यात आणखी मोठे यश मिळवण्याची प्रेरणा देईल. तसेच, या परीक्षेत अपेक्षित यश न मिळवलेल्या विद्यार्थ्यांना आमचा संदेश आहे की, अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. असं काही घडलं की तुम्ही खाली जाऊन स्वतःला तपासून नव्या दृष्टीकोनाने जीवनाला सामोरे जाण्याची संधी मिळवू शकता. जीवनात आपले ध्येय साध्य करण्यासाठी अपयश हे एक साधन असू शकते, हे लक्षात ठेवा. आत्मविश्वास आणि चिकाटीने पुन्हा उभे राहा–तुम्ही यशस्वी होणारच.
"सपने उन्हात जळतात, त्यातूनच प्रेरणा निर्माण होते."
**– आसाराम विरकर**
**उपसंपादक**
**दैनिक युवक आधार – मराठवाडा आवृत्ती**

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

अहिल्यानगर )- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यावर्षी देखील संख्यात्मक व गुणात्मक निकाल सर्वोत्कृष्ट लागला आहे.
वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५०टक्के गुण मिळवून सायन्स विभागात विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर आर्यन कैलास बोरा याने ९५.६७टक्के गुण मिळवून कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच आर्यन कैलास बोरा, प्रेम आनंद कोठारी, पार्थ मंगेश चंगेडिया, स्मित संतोष गुगळे या विद्यार्थ्यांनी बुक कीपिंग अँण्ड अकाउंटन्सी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. त्याचप्रमाणे गणित व आयटी विषयांमध्ये आर्यन कैलास बोरा याने शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत.
सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच गुणांनुक्रमे विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अभय फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळाचे सदस्य तसेच विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक पोपट पवार, पर्यवेक्षक बाळू वाव्हळ, विष्णु गिरी, कैलास साबळे



## एफआरपीची उर्वरीत रक्कम शेतकऱ्यांच्या बँकेत वर्ग

**लोणी धामणी :** दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु, येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या ऊसाची एफ.आर.पी. रु. ३०७९.१२ येत असून प्रथम ॲडव्हान्स रु. २८०० प्रती मे.टन वजा जाता उर्वरित रु. २८० प्रती मे.टनाप्रमाणे रक्कम रु. ३१ कोटी ८७ लाख ७८ हजार शेतक-यांच्या बँक खात्यावर (दि. ५ मे) वर्ग केली असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना बाळासाहेब बेंडे म्हणाले की, उच्च न्यायालय व शासनाचे निर्णयानुसार मागील हंगामाचा साखर उतारा गृहीत धरून मागील हंगामाचा ऊस तोडणी वाहतूक खर्च वजा करावयाचा आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री व कारखान्याचे संस्थापक-संचालक मा.आ. दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ सभेतील निर्णयानुसार हंगामाकरीता देय एफ.आर.पी. रु. ३०७९.१२ प्रती मे.टन येत आहे. कारखान्याने हंगामात गाळप केलेल्या ऊसास प्रथम ॲडव्हान्स रु. २८०० प्रती मे. टनाप्रमाणे रक्कम अदा केलेली आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये कारखान्याने एकूण ११ लाख ३८ हजार ४९६ मे.टन ऊस गाळप केले आहे. उर्वरित एफ. आर.पी. रु.२८० प्रती मे.टनाप्रमाणे रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या बँक खात्यावर रक्कम रु. ३१ कोटी ८७ लाख ७८ हजार सोमवार (दि. ५ मे) रोजी वर्ग करण्यात आली. कारखान्याने आत्तापर्यंत कार्यक्षेत्र व परिसरातील ऊस उत्पादक शेतक-यांना नेहमीच वेळेमध्ये चांगला दर दिलेला आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतक-यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे.

## उत्पादन वाढीसाठी जमिनीचे आरोग्य महत्त्वाचे : डॉ. ढगे

**नेवासा :** तालुक्यातील पाथरवाला येथे ऊस प्रात्यक्षिक क्षेत्र भेट व शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. सिंजटा फाउंडेशन इंडिया व एन्व्हायरमेंटल डिफेन्स पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने पाथरवाला येथे खोडवा उसाच्या पाचटाचे शास्त्रीय व्यवस्थापन या प्रात्यक्षिक क्षेत्राला भेट व त्या अनुषंगाने शेतकरी मेळावा तांत्रिक चर्चा करून संपन्न झाला.ऊस उत्पादन वाढीसाठी जमिनीचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. अशोक ढगे यांनी यावेळी बोलतांना केले

प्रगतशील शेतकरी दत्तात्रय खाटीक यांनी प्रास्ताविक करून सर्व उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार पांडुरंग अभंग होते.

प्रमुख मार्गदर्शक व अतिथी माजी कुलगुरू व कृषी शास्त्रज्ञ डॉ. ढगे यांनी प्रतिपादित केले की ऊस उत्पादन वाढीसाठी विविध घटकांचा विचार करता जमिनीचे आरोग्य सर्वात महत्त्वाचे आहे त्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर आणि जिवाणू खतांची जोड रासायनिक खताला आवश्यक आहे. जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढले असून सेंद्रिय कर्ब कमी झाला आहे. जमिनी भुसभुशीत राहिल्या नाहीत त्यामुळे उसाचे उत्पादन कमी होत चालले आहे तरी शेतकरी बंधूंनी जमिनीच्या आरोग्याची काळजी घ्यावी पाण्याचे व्यवस्थापन, समतोल खतांचा व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर कीड व रोगांचा जैविक पद्धतीने नियंत्रण या संदर्भात त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

## राष्ट्रीय खेलो इंडिया पिंच्याक सिलाट स्पर्धेत बारामतीच्या मुलींची गोल्डन कामगिरी

**बारामती :** १ ते ४ मे रोजी क्राईस्ट अकॅडमी मुंबई या ठिकाणी राष्ट्रीय पिंच्याक सिलाट खेलो इंडिया उमन्स लीग स्पर्धा पार पढली. या स्पर्धेत भारतातील एकूण ३५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा स्पोर्ट्स अथोरेटी ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने झाल्या या स्पर्धेसाठी इंडियन पिंच्याक सिलाट असोसिएशन चे अध्यक्ष किशोर येवले, खासदार नरेश म्हस्के , साई चे ऑबजरवर प्रमोद सिंगडे, शीतल कचरे, तारिख भाई व आदि मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत बारामतीच्या योद्धा स्पोर्ट्स क्लब च्या ४ मुलींची निवड राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी झाली होती. यामध्ये वैष्णवी गुळवे व यशश्री माने यांनी गंडा या प्रकारात गोल्ड मेडल मिळवून १० हजार रुपयाची खेलो इंडियची स्कॉलरशिप मिळवली. तर श्रेया गरजे या खेळाडूने फाईट (टँडिंग) या प्रकरत हरियाणा व मध्यप्रदेश आणि दिल्ली च्या खेळाडूला हरवून रजत पदक




मिळवून आपल्या नावे ६ हजार रुपयांची स्कॉलरशीप मिळवली, तर आर्य बोडरे या खेळाडूने अतिशय चांगली कामगिरी केली. या सर्व खेळाडूंनी साहेबराव ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीत योद्धा स्पोर्ट्स क्लब अकॅडमी या ठिकाणी गेली ४ वर्ष प्रॅक्टिस केली. या सर्व खेळाडूंना सूर्यनगरीतील सर्वच पालकांनी अतिशय मदत केलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सूर्यनगरीतील योद्धा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अक्षय थोरात, अनंत युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण माने, अक्षय जगताप, अनंत भोसले, किशोर गरजे, सुरेश बोडरे, चंद्रकांत माने, राहुल गुळवे इत्यादीनी कौतुक केले व योद्धा स्पोर्ट्स क्लब ला लागेल ती मदत करण्याचे आश्वसन दिले. योद्धा स्पोर्ट्स क्लब गेली १२ वर्ष बारामती वा सूर्यनगरी परिसरात मुलांना ट्रेनिंग देण्याचे काम करत आहे. आजपर्यत अनेक मुलं राष्ट्रीय व अंतराराष्ट्रीय स्पर्धेत चकमकली आहेत. आणि याच कारणामुळे बारामतीतील पालकांनाचा विश्वास योद्धा स्पोर्ट्स वर आहे आणि तो कायम राहील. या सर्व खेळाडूंना राज्यसभा खासदार सुनेत्राहिनी पवार यांनी शुभेच्छा दिल्या.

## शेतकऱ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ तहसीलवर विविध संघटनांचा मोर्चा

**नेवासा :** पुरंदर विमानतळास जमिनी देण्यास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यावर लाठीचार्ज करणाऱ्या महायुती सरकारचा आज नेवासा येथे काँग्रेस व विविध संघटनाकडून जाहिर निषेध करण्यात आला. पुरंदर विमानतळास येथील स्थनिक सात गावांचा प्रखर विरोध असून एकतपूर या गावात पुरंदर विमानतळ जमिनीसाठी ड्रोन सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या सरकारी यंत्रनेस स्थानिक शेतकऱ्यांनी शांततेच्या मार्गाने विरोध केला. आम्ही आमच्या जमिनी विमान तळास देणार नाही, सर्वेक्षण बंद करा अशी ठाम भूमिका येथील स्थानिक शेतकऱ्याकडून घेण्यात आली. याठिकाणी रस्त्यावर गाडी बैलासह पूर्ण गावाकऱ्यांनी आंदोलन करत विरोध दर्शवीला. परंतु या विरोधास पोलिसांकडून जोरजबरदस्तीने मोडून काढण्याच्या प्रयत्नात आंदोलनानी वेगळे वळण घेतले पोलिसांनी शेतकऱ्यांवर अस्रूधुराच्या नळकांड्या सोडत, स्थानिक शेतकऱ्यावर अमानुष लाठीचार्ज केला. या लाठीचार्जमध्ये शेतकरी महिलेने आपला जीव गमावला. तर शेकडो शेतकरी गंभीर जखमी झाले. पोलिसांनी केलेल्या या लाठीचार्जचा महाराष्ट्रभरातील शेतकऱ्यांकडून निषेध करण्यात आला.आज नेवासा तालुक्यात काँग्रेसकडून शेतकऱ्यांवर झालेल्या लाठीचार्ज घटनेचा निषेध करण्यात आला यावेळी सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी सत्ता आल्यावर पूर्ण कर्जमाफीची घोषणा करणारे कर्जमाफी दूरच आता शेतकऱ्याच्या जमिनी हिसकावून घेत आहे. राज्यातील महायुतीचे सरकार हिटलरशाही सरकार असून कुठल्याही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी यांच्यापुढे झूकू नये.
शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी काँग्रेस पक्ष शेतकऱ्याच्या पाठीशी ठाम असून पोलिसांना शेतकऱ्यांवर लाठीचार्जचे आदेश देणारे कोण होते हे सर्व महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे.लाठीचार्ज करणारे पोलीस जनरल डायर पेक्षाही क्रूर असून यांना निलंबित केलेच पाहिजे. असे स्पष्ट मत व्यक्त केले.शेतकरी संघटनाचे त्रिंबक भदगले यांनी महाराष्ट्रातील सर्व शेतकरी बांधव व शेतकरी संघटना या पुरंदच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकऱ्यांनी या जुलमी सरकारला उखडून फेकावे असे स्पष्ट केले. स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे यांनी पुरंदर घटनेचा जाहीर निषेध करत याविरोधात पूर्ण महाराष्ट्रभर निदर्शने करण्याचा ईशारा दिला.
शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अशोकराव काळे यांनी शेतकरी सरकारला धडा शिकविल्याशिवाय गप्प बसणार नाही असा इशारा दिला, तसेच यावेळी बसपाचे हरीश चक्रनारायण, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे, मराठा संघांचे गणेश झगरे, आदिनी मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष अण्णासाहेब पटारे, ॲड. सागर सागडे, ॲड. ज्ञानेश्वर शिरसाठ, ॲड. बाबासाहेब कावले, गुलाबभाई पठाण, संजय होडगर, युसूफ शेख, विजय शिंदे, दिगंबर आवारे, शेषराव गव्हाणे, दत्तात्रय निकम,असिफ पटेल आदिसह शेतकरी उपस्थित होते. यावेळी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले.

# किंग ऑफ कुंभार्ली सायकल रेस दिमाखात संपन्न

## खुल्या गटातील सिद्धेश पाटील ठरला किंग ऑफ कुंभार्ली

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण**
: सायकलिंग क्लब तर्फे आयोजित किंग ऑफ कुंभार्ली ही देशभरातील ख्यातनाम सायकल रेस रविवार दि. 4 मे 2025 रोजी मोठ्या दिमाखात पार पडली. अल्पावधीतच प्रसिद्धीचे शिखर गाठलेल्या या सायकलिंग स्पर्धेचे हे चौथे वर्ष होते. देशविदेशातून 350 हून अधिक सायकलपटूंनी या रेस साठी रजिस्ट्रेशन केले होते. 10-17 वयोगट किड्स गट, महिला खुला गट, पुरुष सिनिअर गट, पुरुष मास्टर्स गट, पुरुष खुला गट अशा पाच विभागांत सायकलपटू विभागलेले होते. यावर्षी प्रथमच 8 शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सायकलपटू, तसेच 33 राज्य/राष्ट्रीय खेळाडू, 15 हून अधिक आयर्नमन, 5 आशिया चॅम्पियनशिप खेळलेले खेळाडू यांची मांदियाळी चिपळूण नगरीमधे भरली होती. यावर्षीच्या किंग ऑफ कुंभार्ली या रेसच्या चौथ्या पर्वाचे विशेष आकर्षण म्हणजे सर्व कॅटेगरीतील प्रत्येक प्रथम क्रमांकासाठी पाच फूट उंचीची भव्य ट्रॉफी होती. त्यामुळे ती मिळविण्यासाठी सर्व सायकलपटू मधे जोरदार चुरस अपेक्षित होती. मा. मुख्याधिकारी श्री. विशाल भोसले साहेबांच्या हस्ते झेंडा दाखवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सर्व सायकलपटू कुंभार्ली घाटमाथ्याच्या दिशेने रवाना झाले. रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी टाळ्या वाजवून सायकलस्वारांना प्रोत्साहीत केले. हौशी ढोलपथकांच्या तालावर सायकलस्वारांनी पोफळी पर्यंत अत्यंत वेगाने मार्गक्रमणा केली. एकमेकांच्या पुढे जाण्यासाठी लागलेल्या चुरशीने उपस्थितांच्या नजरेचे पारणे फेडले. पोफळी कमानीपासून सायकलपटूंचा कस बघणारी चढाई सुरु झाली आणि आत्तापर्यंत थोडं मागे थांबून आपली उर्जा राखलेल्या सायकलस्वारांनी बघता बघता त्या जत्थ्यातून आपल्या सायकली पुढे दामटल्या आणि इतर स्पर्धकांवर निर्विवादपणे वर्चस्व मिळविले.
12 किमी खडी चढण असलेल्या कुंभार्ली घाटासाठी पुढे असणा-या मोजक्या सायकलस्वारांमधे देखील किंग ऑफ माउंटन या पारितोषिकासाठी चढाओढ होती. या संपूर्ण 29 किमी साठी सुमारे 750 मीटर्स पेक्षा जास्त उंची गाठत या सायकलस्वारांनी हे आव्हान यशस्वीपणे पेलले आणि हेही पारितोषिक पटकावले. गट निहाय प्रथम तीन सायकलस्वारांची नावे पुढीलप्रमाणे:
10-17 किड्स –
प्रथम क्रमांक – आर्यन सुनिल माळगे (१तास:११मिनिटे:१४सेकंद:३७२मिली सेकंद)
द्वितीय क्रमांक – यश सागर देवकुळे (१तास:११मिनिटे:१४सेकंद:३७३मिली सेकंद)
तृतीय क्रमांक – आर्यन संदीप जाधव (१तास:११मिनिटे:१४सेकंद:८७२मिली सेकंद)
*१२ किमी किंग ऑफ माउंटन* – आर्यन सुनिल माळगे (३९मिनिटे:२०सेकंद)
**महिला खुला गट –**
प्रथम क्रमांक – जुई गजानन नारकर (१तास:१५मिनिटे:४८सेकंद:३५४मिलीसेकंद), द्वितीय क्रमांक – योगेश्वरी महादेव कदम (१तास:१९मिनिटे:४१सेकंद:३४०मिलीसेकंद), तृतीय क्रमांक – राजनंदिनी सोमवंशी (१तास:१९मिनिटे:४१सेकंद:५६९मिलीसेकंद)
*१२ किमी किंग ऑफ माउंटन* – जुई गजानन नारकर (४३मिनिटे:५२सेकंद)
**पुरुष सिनिअर गट –**
प्रथम क्रमांक – श्री. महेश किणी (१तास:१६मिनिटे:०७सेकंद:८५३मिलीसेकंद), द्वितीय क्रमांक – संतोष पवार (१तास:१७मिनिटे:१०सेकंद:५९५मिलीसेकंद)
तृतीय क्रमांक – आस्ताद पालखीवाला (१तास:१७मिनिटे:४३सेकंद:०८८मिलीसेकंद)
१२ किमी किंग ऑफ माउंटन – महेश किणी (४४मिनिटे:४६सेकंद)
**पुरुष मास्टर्स गट –**
प्रथम क्रमांक – राहूल शिरसाट (१तास:०९मिनिटे:५९सेकंद:९१८मिलीसेकंद), द्वितीय क्रमांक – अनूप पवार (१तास:११मिनिटे:०३सेकंद:५९०मिलीसेकंद),तृतीय क्रमांक – अर्जून पाटील (१तास:११मिनिटे:०३सेकंद:५९०मिलीसेकंद)
*१२ किमी किंग ऑफ माउंटन* – राहूल शिरसाट (३८मिनिटे:१६सेकंद)
**पुरुष खुला गट –**
प्रथम क्रमांक – सिद्धेश अजित पाटील (१तास:०३मिनिटे:२९सेकंद:१९५मिलीसेकंद), द्वितीय क्रमांक – सूर्या थातू (१तास:०३मिनिटे:२९सेकंद:९५५मिलीसेकंद), तृतीय क्रमांक – निहाल मुसा नदाफ (१तास:०३मिनिटे:३१सेकंद:४६२मिलीसेकंद)
१२ किमी किंग ऑफ माउंटन* – सिद्धेश पाटील (३४मिनिटे:३३सेकंद)
स्पर्धा संपल्यानंतर चिपळूण संगमेश्वर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार श्री. शेखर निकम सर यांच्या हस्ते सर्व स्पर्धकांना गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभात चिपळूण सायकलिंग क्लब तर्फे श्री शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सायकलपटूंचा मा. आमदार श्री. शेखर निकम सर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.
याप्रसंगी चिपळूण डिवायएसपी श्री. राजमाने साहेब, विनती ऑरगॅनिक्सचे श्री. सुमेरजी तारे, एक्सेल इंडस्ट्रीजचे श्री. आनंद पाटणकर, डॉ. अब्बास जबले, डॉ. गोपीनाथ वाघमारे, पु.ना. गाडगीळचे श्री. मयूर सुर्वे, श्री. प्रथमेश नामजोशी, श्री. अनिरुद्ध निकम, प्रसिद्ध यू ट्यूबर श्री. महेश दाभोळकर, मेनेकी अबसोल्यूटच्या प्रिती गुप्ता, सह्याद्री क्लासिकचे डॉ. आदित्य पोंक्षे, काळकाई अग्रोचे नितिश पाटणे, सायक्लॉजिस्ट – पुणे चे श्री.अभिजीत लोकरे, फय्याज सायकलचे श्री. अकिल सय्यद तसेच इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सहभागी स्पर्धकांनी चिपळूण सायकलिंग क्लबच्या उत्कृष्ट आयोजना बाबत भरभरून प्रतिक्रिया दिल्या तर अनेकांनी लवकरच ही देशातील अग्रगण्य सायकल स्पर्धा होईल असा विश्वास व्यक्त केला. सदर स्पर्धेसाठी प्रांताधिकारी श्री. लिगाडे, डिवायएसपी श्री. राजेंद्र कुमार राजमाने, चिपळूण पोलिस निरिक्षक श्री. फुलचंद मेंगडे, शिरगाव पोलिस निरिक्षक श्री. भरत पाटील व सर्व पोलीस कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. चिपळूण सायकलिंग क्लब पर्यावरण रक्षणासाठी नेहमीच सजग असतो. त्यामुळे स्पर्धकांनी वापरलेल्या पाण्याच्या बाटल्या स्वयंसेवकांनी लगेचच गोळा केल्या. याकामी चिपळूण येथील सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेची दरवर्षी मोलाची मदत होते. बाटल्या गोळा करणे, वाहतूक करणे आणि त्या रिसायकल करणे ही सर्व जबाबदारी सह्याद्री निसर्ग मित्र या संस्थेचे संस्थापक व ज्येष्ठ निसर्गमित्र श्री. भाऊ काटदरे आणि त्यांचे सर्व स्वयंसेवक आपल्या खांद्यावर घेतात. चिपळूण सायकलिंग क्लबचे अध्यक्ष श्री. विक्रांत आलेकर यांनी सर्व देणगीदार, स्पर्धक, सह्याद्री निसर्ग मित्र, स्पर्धकांना शुद्ध पाणी वितरण करणाऱ्या चिपळूण तालुका स्पोर्ट्स अकादमीचे स्वयंसेवक तसेच चिपळूण सायकलिंग क्लबचे सर्व सभासद व स्वयंसेवक यांचे आभार मानले.